दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य — संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार, दि.२४ मे २०२५ | वर्षे ४थे | अंक २७९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# मान्सून केरळात दाखल

**पंधरा जूनपर्यंत देशातील बहुतांश भागात मान्सून**

**यंदा चांगला पाऊस पडणार असल्याने शेतकरी आनंदीत**

**पुणे वेधशाळेने वर्तविला मान्सूनचा अचूक अंदाज**

**तब्बल १६ वर्षांनी वेळेपूर्वीच मान्सून धडकणार**

पुण्यभूमी प्रतिनिधी

**पुणे:** भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या मान्सूनसंदर्भात अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी आहे. भारतीय हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार यंदा मान्सून वेळे आधीच रविवारी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार सध्या मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे येत्या २५ मे पर्यंत मान्सून हा केरळच्या किनारपट्टीवर दाखल होऊ शकतो. गेल्या वर्षी ३० मार्च रोजी मान्सूनची केरळमध्ये एन्ट्री झाली होती.मात्र यंदा वेळेपूर्वीच म्हणजे २५ तारखेला मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००९ साली केरळमध्ये वेळेआधी मान्सून दाखल झाला होता, त्यानंतर आता तब्बल १६ वर्षांनी वेळेपूर्वीच मान्सून केरळमध्ये दाखल होणार आहे.

पंधरा जूनपर्यंत देशातील बहुतांश भागात मान्सूनने व्यापण्याची शक्यता आहे. दरम्यान



यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. यंदा भारतामध्ये सरासरी १०७ टक्के पाऊस पडू शकतो असा अंदाज आहे. हवामान खात्यानं वर्तवलेल्या पावसाच्या अंदाजानंतर शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला असून पेरणीपूर्व मशागतींना अनेक भागांमध्ये वेग आला आहे. येत्या २५ मे पर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे, त्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये मान्सूनची एन्ट्री दक्षिण भारत आणि मध्य भारतात होणार आहे, मात्र याच दरम्यान दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्र किना-यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. याचा परिणाम म्हणजे सध्या महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जोरदार अवकाळी पाऊस सुरू आहे. पुढील छत्तीस तास महत्त्वाचे असून आयएमडीकडून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या अवकाळी पावसाचा शेतक-यांना मोठा फटका बसला आहे, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे, तर दुसरीकडे नागरिकांना वाढत्या उष्णतेपासून दिलासा देखील मिळाला आहे.

### यंदा चांगल्या पावसाचा अंदाज

दरम्यान यंदा मान्सूनबद्दल गुडन्यूज आहे, ती म्हणजे देशात पावसाचं प्रमाण चांगलं राहणार आहे. सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतक-यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

## रामटेक निवासस्थानी हितगूज

स्नेहमीलन: पंकजा मुंडेंनी कार्यकर्त्यांशी साधला संवाद



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई: राजकारण, समाजकारण करत असताना माझ्या संकटात आणि विजयात तुम्ही तेवढेच साक्षीदार आहात. तुमच्यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचले आहे, त्यामुळे तुमच्यासाठी जे जे काही चांगलं असेल ते करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. जन सामान्यांची कामं आणि सर्वांना बळ देण्याचं काम 'रामटेक' मधून होईल अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी हितगूज साधलं.बीड जिल्हयातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी मुंबईतील रामटेक या शासकीय निवासस्थानी ना. पंकजाताई मुंडे यांनी एक छोटेखानी कौटुंबिक स्नेहमिलन कार्यक्रम काल आयोजित केला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या. आई प्रज्ञाताई मुंडे यावेळी आवर्जून उपस्थित होत्या.

### सर्वांना बळ देऊ...

राजकारणात काम करत असताना आतापर्यंत अनेक चढ उतार अनुभवले. कटू प्रसंगानंतर गोड अनुभव देखील आले. सर्व काळात तुमचा पाठिंबा आणि साथ मला लाभली. माझ्या जिल्हयातील कार्यकर्ता स्वाभिमानी आहे. तुमच्यासाठी जे जे चांगले आहे, ते करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. या बंगल्यातून सर्वांना बळ देण्याचे काम होईल. नाव माझे असले तरी बंगला तुमचा आहे, त्यामुळे तुमच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी मी कटिबध्द आहे असं ना. पंकजाताई म्हणाल्या.

ना. पंकजाताई मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब उप मुख्यमंत्री असताना याच रामटेक निवासस्थानी माझं बालपण गेलं, त्यानंतर तब्बल तीस वर्षांनंतर » पान २ वर

## ...अन्यथा करणार आत्मदहन

सचीन जोगदंड : प्रशासन सुनिल नागरगोजेवर कार्यवाही कधी?

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज: केज अंबाजोगाई मतदार संघातील सुनिल नागरगोजे यांनी जरांगे पाटीलचे नाव घेऊन तुम्ही जातीवाद करीत आहात असे सचीन जोगदंड यांना म्हणाले या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की जरांगेचा माणूस म्हणून वावरतो स्वतःला शहाणा समजतोस का असे सुनील नागरगोजे सचीन जोगदंड यांच्या वर टाकुन जरागे दादा पाटील यांना जातीवादी ठरवण्याचा पूर्णपणे जाणून बुझून प्रयत्न केलेला आहे.त्यांच्या ड्राईव्हरला व्हीडीओ काढायला लावला आणि तो विडीओ फेसबुक वर वायरल केला त्या व्हिडीओ मध्ये असंवेदनशील वक्तव्य श्री. नागरगोजे यांचे वक्तव्य कैद झालेले आहे. लिपीक नम्ही पाहू शकता. है व्हीडीओ गेल्या दोन दिवसापासून फिरत असल्याने माझ्या मनाला तीव्र वेतना झाल्या माझे मनोज दादा १८ पक्कड जाती जमातीला घेऊन आंदोलन करतात त्याना जातीवादी ठरवण्याचा संकल्प नागरगोजे यांनी केला असा त्या व्हीडीओ मध्ये दिसून येते त्या सर्व प्रकार पाहून माझे मन चलबिचल होऊन जीव द्यावा असे वाटत असल्याने जीवन यात्रा संपवण्यासाठी आत्मदहन करणार. यापूर्वी अंबाजोगाई शहर पो.स्टे.ला पोलिस म्हणून कार्यरत असताना खाकीचा धाक दाखवून सर्व सामान्यांना त्रास देत होता सर्व्हिस मध्ये असताना वरिष्ठांना शिवीगाळ करणे ओरावी ची भाषा वापर करणे या कारणान निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांची वागणूक बरोबर नाही असे सचीन जोगदंड यांनी म्हटले आहे तरी कार्यवाही करण्यात यावी व पुढील मागण्या मान्य करण्यात याव्यात अशी मागणी सचीन जोगदंड यांनी केली आहे सुनिल नागरगोजे यांनी मनोज दादा जरांगे पाटील यांची जाहीर माफी मागावी व मनोज दादा हे जातीवादी नाही. हे नेतृत्व सर्व समावेषक आहे. असा व्हीडीओ करून सोशल मिडियावर टाकावा. सुनिल नागरगोजे » पान २ वर

## आडस रोडवर ट्रक पुलात घसरला

दुर्घटना: गाडीला साईड ग्लास नसल्यामुळे अपघात



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: अंबाजोगाई ते आडस रोडवर चनई गावा जवळ दुचाकी ला वाचवण्याच्य प्रयत्नामुळे ट्रक रोडच्या बाजूला घसरून रोड नजीकच्या पुलात अर्धी आणि रोडवर अर्धी या अपघाता मध्ये कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही परंतु या मार्गावर दि १४ तरखेला दुचाकीस्वाराला वाचण्याच्या प्रयत्नांमुळे गाडीवरील ड्रायव्हरचा ताबा सुटला ईरटीका गाडी चा » पान २ वर

## अज्ञात वाहनाच्या धडकेत हरणाचा मृत्यू

दुःखद: सिरसाळा-पोहनेर रोडवरील घटना

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: परळी तालुक्यातील सिरसाळा-पोहनेर रस्त्यावर एका अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेत एका हरणाचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. विशेष म्हणजे, याच परिसरात दोन वर्षा पुर्वी अशीच एक घटना घडली होती, या घटनेनंतर तब्बल दोन तास फोन करूनही वनविभागाचा कोणताही अधिकारी घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, काल दिनांक २३ रोजी साडे सहा वाजण्याच्या सुमारास सायंकाळी सिरसाळा-पोहनेर रस्त्यावरुन जाणाऱ्या एका अज्ञात चारचाकी वाहनाने हरणाला धडक दिली. या धडकेत बिचाऱ्या हरणाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच काही स्थानिक नागरिकांनी तात्काळ वनविभागाचे अधिकारी नागरगोजे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोन तास उलटूनही वनविभागाचा एकही अधिकारी घटनास्थळी फिरकला नाही. यामुळे संतप्त नागरिकांनी वनविभागाच्या या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.दोन वर्षा पुर्वी फक्त २०० मीटर अंतरावर अशीच एक घटना घडली होती, ज्यात हरणाला अज्ञात चर्चा की वाहनाने धडक दिली होती त्या अपघातात मृत्यू झाला होता. सातत्याने घडणाऱ्या या घटनांमुळे या अधिकारी रस्त्यावर वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वनविभागाने या मार्गावर वन्यजीवांसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, » पान २ वर

## बीडमध्ये पुन्हा गोळीबाराचा थरार

खळबळ: पवनचक्की कंपनीच्या बाहेर थरार

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: पवनचक्कीच्या सुरक्षा रक्षकाने गोळीबारी केला आहे. या गोळीबारात एकाचा मृत्यू झाला आहे. चोरीच्या उद्देशाने काही तरुण पवनचक्की परिसरात शिरल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा रक्षकानं गोळीबार केला आहे. नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली.बीडच्या लिंबागणेशच्या महाजनवाडी परिसरात गुरुवारी रात्री




पवनचक्की कंपनीच्या परिसरात चोरीसाठी आलेल्या चोरट्यांवर सुरक्षारक्षकाने गोळीबार केल्याची घटना घडली आहे. यात एकाचा मृतदेह परिसरात आढळला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून, नेकनूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. मयत व्यक्तीची ओळख अद्याप पटली नाही. बीडच्या लिंबागणेशच्या महाजनवाडी परिसरात गुरुवारी रात्री पवनचक्की कंपनीच्या परिसरात चोरीसाठी आलेल्या चोरट्यांवर सुरक्षारक्षकाने गोळीबार केल्याची घटना घडली आहे. यात एकाचा मृतदेह परिसरात आढळला आहे. या घटनेने » पान २ वर

## परळीतील रेल्वे उड्डाणपूल बंद

निर्णय: बायपास रोड वापराचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपूल दुरुस्तीसाठी २६ मे ते ३० जून यादरम्यान वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे बीड आणि गंगाखेड तसेच परभणी कडे जाणाऱ्या वाहनधारकांनी परळी बायपास रोडचा वापर करावा असे आवहान राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, लातूर यांनी केले आहे.



परळी शहरातील शाममुखर्जी उड्डाणपूल हा अनेक दिवसापासून दुरुस्त करावा तसेच पूलाचे रुंदीकरण करावे अशी मागणी होत होती. पूलावरील नेहमी पडणा-या » पान २ वर

## तांदळा येथे आमरण उपोषण | १४० गावातील नागरिक सहभागी

# न्याय हक्कासाठी, शेतकऱ्यांचा लोकलढा

पुण्यभूमी प्रतिनिधी

कोळगाव: तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंखे दि.२५ मे रोजी पासून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आमरण उपोषण करणार असून सुमारे १४० गावातील शेतकरी या आंदोलनात सहभागी होणार आहेत, या आमरण उपोषणाची जनजागृती मोठ्या प्रमाणात होत असून जनजागृती बैठकींना सभेचे स्वरूप प्राप्त होत आहे.बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होती, या दुष्काळी भागातील कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जायकवाडीच्या कालव्यातून उपकालवा करून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणी द्यावे, या मागणीसाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा सुरू केला आहे.



अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तांदळा येथे दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण करण्यात येणार असून पुढील प्रमाणे उपोषणकर्त्यांची मागणी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड कडे निवेदनाद्वारे केली आहे.१)निवडणुकी वेळी दिलेले शेतकरी कर्ज माफीच्या आश्वासनाची आमलबजावनी करून सरसकट शेतकरयांचा ७/ १२ कोरा करण्यात यावा.

२)नदी जोड प्रकल्प करून धरणात, नदीत, नाल्यात, ओढयात, पाटात पाणी सोडा व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी पाट काढण्यात यावे त्यामुळे कायम स्वरूपी मराठवाडयासह महाराष्ट्रील शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल ३) स्वामीनाथन आयोगच्या शिफारशी प्रमाणे शेतीमालाला दिडपट हमीभाव दया व आज पर्यंत शेती मालाला योग्य हमी भाव न दिल्या मुळे शेतकरी वर्गाचे लाखों रूपये सरकारकडे बाकी आहे ते व्याजासह शेतकरी वर्गाच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे

४)एक रुपयात पिक विमा हि योजना बंद करण्यात येणार आहे ती बंद न करता चालुच ठेवा व पिक विमा चार कव्हरेज रद्द करण्यात येऊ नये ५) म.ग्रा.रो.ह.योजनेतील मंजुर रस्ते ,शेततळे ,विहिर ,गोठे, वृक्ष लागवड इत्यादी कुशल /अकुशल रककम तात्काळ वितरीत करावी.६) हिंदु » पान २ वर

## कार्यकर्तृत्व दिग्गजांचा सत्कार सोहळा

आवाहन: सचिनभाऊ कागदे मित्र मंडळातर्फे आयोजन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: स्मृतीशेष ईश्वरजी कागदे सेवाभावी संस्था परळी वै. आणि सचिनभाऊ कागदे मित्र मंडळातर्फे आंबेडकरी समुहातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवारी दि.२५ मे २०२५ रोजी सिद्धार्थ नगर बुद्ध विहार येथे सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडेल.या सोहळ्यात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, साहित्यिक, कला, पत्रकारिता, धम्मकार्य, आंबेडकरी चळवळ, प्रशासकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे.

यामध्ये रामदादा किरवले, प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, प्रो.डॉ. संजय जाधव, रानबा गायकवाड, उपजिल्हाधिकारी महादेवजी किरवले, उप शिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे, उत्तमजी कांबळे, डॉ. राजेश इंगोले, प्राचार्य महेंद्र शिंदे , डॉ. विक्रम धनवे, डॉ. सुजाता धनवे, प्रा. डॉ. माधव रोडे, प्रा. डॉ. विनोद जगतकर, डॉ. दयानंद मस्के, ,प्रा. दयानंद झिंजुर्डे, डॉ. धम्मपाल घुमरे, डॉ. सचिन भुंबे, डॉ. विजयानंद बनसोडे, अमोल कांबळे, दिलीप भालेराव, वैभव (भैय्यासाहेब) आदोडे, संविधान वाघमारे, चेतन चोपडे, सुधाकर सूर्यवंशी, धोंडीराम रोडे, रणजीत उपाडे, राहुल सूर्यवंशी, बबन मस्के, प्रल्हाद अवचारे, निवेदक बा. सो. कांबळे आदींचा समावेश आहे. विविध क्षेत्रातील योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'स्मृतिशेष ईश्वरजी कागदे स्मृती विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे तसेच स्मृतीचिन्ह, शाल आणि सन्मानपत्र » पान २ वर

## अवकाळीचा तडाखा

गत काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. हवामान विभागाने सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, संभाजीनगर, सोलापूर, बीड या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बुलडाणा आणि विदर्भातील जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवस राज्यात पावसाची अशीच स्थिती राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. गत तीन-चार दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले आहे.पुणे, मुंबई, नाशिक, मराठवाडा, कोकण आणि विदर्भात धो-धो पाऊस पडतो आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात पावसाचे बरसणे सुरू आहे. कर्नाटक किनारपट्टीजवळ चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. गत दोन आठवड्यांपासून राज्यात मान्सूनपूर्व मध्यम सरी आणि मेघगर्जनेसह पाऊस पडत आहे. पुढील पाच ते सहा दिवसांत केरळमध्ये मान्सून धडकण्याची शक्यता आहे. तर १० जूनला मान्सून महाराष्ट्र व्यापणार आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्सून तळकोकणात धडकण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. अवकाळी पावसाचा सर्वांत मोठा फटका शेतक-यांना बसला. उभ्या पिकांवर परिणाम झाला असून भात रोपवाटिका, कांदा, भाजीपाला, आंबा आदींचे मोठे नुकसान झाले आहे.

हवामानातील अस्थिरतेमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना आणि विजांच्या कडकडाटामुळे जीवितहानी होण्याच्या घटना घडल्या. एकीकडे अवकाळी पावसामुळे नुकसान तर दुसरीकडे वेळेआधी मान्सून येण्याची शक्यता यामुळे हवामानाच्या अनिश्चिततेचे दर्शन घडत आहे. बुधवारी लातूर शहर आणि ग्रामीण भागात जोरदार पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. गत आठ दिवसांपासून जिल्ह्यात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा हैदोस सुरू आहे. गत २० दिवसांत जिल्ह्यात सुमारे ८१ मि.मी. पाऊस झाला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजापेक्षा जास्त पाऊस झाल्याने पेरणी करावी की नाही अशी शेतक-याची द्विधा मन:स्थिती झाली आहे. पेरणीनंतर पिकाची जोमात वाढ व्हावी यासाठी १०० मि.मी. पावसाची गरज असते. त्यामुळे शेतक-यांनी पेरणीसाठी घाई करू नये असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. गत पंधरवड्यात मराठवाड्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. वीज कोसळून २७ जणांचा मृत्यू झाला असून २१ जण जखमी झाले आहेत. ३९१ जनावरे मरण पावली आहेत. सुमारे ४ हजार हेक्टरहून अधिक शेतीचे नुकसान झाले आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला शेतक-यांनी खरिपासाठी मशागत सुरू केली होती.परंतु ३ मे पासून अचानक अवकाळी पाऊस सुरू झाला. त्यामुळे मशागतीचे काम बंद पडले. वादळी वा-यासह झालेल्या पावसामुळे अनेक घरांचे छप्पर उडाले, विजेचे खांब आणि झाडे आडवी झाली. शेतपिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. डाळिंब, केळी, आंबा फळपिकांसह टोमॅटो, कांदे, बाजरी, भुईमूग पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे नाशिक जिल्ह्यात दीड हजार हेक्टरचे नुकसान झाले. निफाड तालुक्यात कांदा, मका, भाजीपाल्याचे नुकसान झाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात हळद काढणीत व्यत्यय आला. विदर्भातील जिल्ह्यात गारपीट झाली. अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पावसामुळे शेतपिके, फळबागांचे नुकसान होऊन उत्पन्न सरासरीपेक्षा कमी होत आहे. हवामान विभागाने शेतक-यांना आणि नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. काढणी केलेली पिके निवा-यात ठेवावीत. विजांचा कडकडाट होत असताना झाडाखाली थांबू नये. पाणी साचलेल्या रस्त्यांवर सावधपणे वाहन चालवावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.घरांना गळती लागणार नाही याची खात्री करा आणि स्वच्छ पाण्याचा साठा करा, असे आवाहनही करण्यात आले आहे. कोकणात एप्रिलच्या सुरुवातीलाच सलग दोन दिवस पाऊस पडला. त्यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा, काजूचे मोठे नुकसान झाले. उन्हाळ्यातील अवकाळी पावसामुळे शहरातील मध्यमवर्ग सुखावत असला तरी शेतक-यांना मात्र मोठा फटका बसतो. नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. अवकाळीचा सर्वाधिक फटका अमरावती जिल्ह्याला बसला. संत्रा, कांदा, ज्वारी, मूग आणि केळी पिकांचे नुकसान झाले. नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील मका, ज्वारी, बाजरी, कांदा केळी यासह अनेक पिकांना फटका बसला. अवकाळी पावसाने दाणादाण उडवून दिली असली तरी पाण्याची टंचाई अजून दूर झालेली नाही. टँकरची संख्या वाढतच आहे. सर्वाधिक टँकर हे छत्रपती संभाजीनगर विभागात आहेत. हवामान बदलामुळे अवकाळीचा तडाखा वाढला आहे. पर्यावरणीय -हासाचा वेग पाहता २०५० पर्यंत हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. पाण्याचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. देशामध्ये महिलांना जलसंकटाचा सामना सर्वाधिक करावा लागतो. मे महिना महाराष्ट्रात कडक उष्णतामानाचा महिना मानला जातो,परंतु यंदाचा मे महिना अजबच निघाला. मे महिन्यात असा दमदार पाऊस होणे दुर्मिळच. हवामानतज्ज्ञांच्या मते मे महिन्यातील या असामान्य पावसामागे अनेक कारणे आहेत. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याने, जूनच्या सुरुवातीला मान्सूनपूर्व प्रभाव दिसून येतो पण यंदा हवामानात झालेल्या बदलामुळे मान्सूनपूर्व पावसाला लवकर सुरुवात झाली. सध्या एल-निनोचा प्रभाव कमी झाल्याने वातावरणात आर्द्रता वाढून पाऊस शक्य झाला. मानवनिर्मित कारणांमुळे वातावरणातील अस्थिरता वाढली आणि त्यामुळे हवामानात अनपेक्षित बदल, वाढत्या शहरीकरणाचा प्रभाव, जंगलतोड इ. जिथे हवामान कोरडे असते तिथे मे महिन्यातील पाऊस दिलासा देतो मात्र, काही भागात आंबा, केळी, कापूस यासारख्या पिकांना फटका बसतो. पाणी टंचाई असलेल्या भागात हा पाऊस वरदान ठरू शकतो. यंदाचा मे महिना हवामानाच्या दृष्टीने अपवादात्मक ठरला. हा बदल तात्पुरता की कायमचा ते सांगणे कठीण आहे. अशा पावसासाठी जनतेने आणि प्रशासनाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

# एक फोन अन् बदली झाली रद्द

## दिलासा:थर्मलमधील कर्मचाऱ्यांनी मानले पंकजा मुंडेंचे आभार

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या एका फोनमुळे काही दिवसापूर्वी परळी औष्णिक वीज केंद्रातून भुसावळ येथे बदली झालेल्या तंत्रज्ञ पदावरील कर्मचारी पुन्हा परळी येथे रूजू झाले आहेत. बदली रद्द झाल्याने आनंदित झालेल्या या कर्मचाऱ्यांनी ना. पंकजाताईंची मुंबईत प्रत्यक्ष भेट घेऊन आभार मानले आहेत.

### कर्मचाऱ्यांनी मानले आभार

भुसावळ येथून परत परळीला बदली झाल्याने तंत्रज्ञ २ चे कर्मचारी अविनाश पवार, संतोष ठोकळ, संतोष मुंडे तसेच तंत्रज्ञ ३ चे परमेश्वर बीडगर, गोविंद शेप, संपत बळवंत, गजानन गिते, मंचक फड, शिवाजी बीडगर, गोरखनाथ खाटिक, नागनाथ मुंडे, कृष्णा मुंडे, मदन फड, अरूण फड यांना ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील तंत्रज्ञ २ व तंत्रज्ञ ३ या पदावर कार्यरत असणाऱ्या काही कर्मचाऱ्यांच्या काही दिवसापूर्वी भुसावळ येथे बदल्या झाल्या होत्या. कुटुंबापासून दूर ठिकाणी बदल्या झाल्याने कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय वेगवेगळ्या कौटुंबिक अडचणीमुळे परेशान झाले होते. बदली रद्द व्हावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले पण यश न आल्याने अखेर त्यांना भुसावळ येथे जॉईन व्हावे लागले होते. हया सर्व कर्मचाऱ्यांनी मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन आम्हाला पुन्हा परळीत आणावे अशी विनंती केली होती. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाच्या कौटुंबिक अडचणीची दखल घेऊन वीज निर्मिती कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक फोन केला आणि सर्वांच्या पुन्हा भुसावळ येथून परळी औष्णिक वीज केंद्रात बदल्या झाल्या.



# भोगवटा धारकांना मालकी हक्क देऊन त्यांना न्याय मिळवून देणार- राजकिशोर मोदी

## पीटीआर देण्याच्या मागणीचे राजकिशोर मोदी यांचे जिल्हाधिकारी याना निवेदन

अंबाजोगाई /प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात अनेक ठिकाणी नवीन वस्त्या त्याचबरोबर काही जागांवर अतिक्रमण करून अनेक वर्षे पासून शेकडो कुटुंब भोगवट्यामध्ये रहात आहेत. अशा कुटुंबाना मालकीमध्ये घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पिटीआर द्याव्यात अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. शहरातील विविध वस्त्यामधील भोगवटा धारकांना मालकीत घेऊन त्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देणार असल्याचे राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.



वरील मागणीसाठी सादर केलेल्या निवेदनामध्येअंबाजोगाई नगर परिषद हद्दीतील असणाऱ्या लोक वस्त्यामधील अतिक्रमण धारकांच्या घरांच्या नोंदी भोगवटयामध्ये आहेत. ज्यामध्ये क्रांती नगर, लाल नगर, कबीर नगर, रायगड नगर, सिद्धार्थ नगर, मिलिंद नगर, गांधी नगर ,बोधी घाट, पेन्शन पुरा, सदर बाजार, समता नगर, भीम नगर, दमदम पुरा, शाह बट्टा, गवळी पुरा या अशा इतर वस्त्या गेल्या अनेक वर्षापासून वसलेल्या आहेत. तेथे हजारो कुटुंब आपल्या कुटुंबियांसह वास्तव करत आहेत. २००९ साली महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढून सदरच्या अतिक्रमण धारकांच्या भोगवट्यातील नोंदी मालकीत घ्याव्यात असा स्पष्ट उल्लेख केला आहे. मात्र भूमी अभिलेख खात्याच्या धोरणामुळे आजपर्यंत यात यश मिळू शकले नाही. मात्र याच परिपत्रकाच्या आधारे गेवराई नगर परिषदेने भोगवटा धारकांना मालकीच्या पीटीआर दिल्या आहेत. त्याच पध्दतीने अंबाजोगाई नगर परिषदेने देखील येथील हजारो भोगवटा धारकांना त्यांच्या मालकीच्या जागेत घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पी टी आर द्याव्यात जेणे करून त्यांना शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास घरकुल योजना व अन्य शासकीय योजनांचा लाभ घेता येईल अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर राजकिशोर मोदी, आदमाने महादेव , खालेद चाउस, गणेश मसणे, सुनील वाघाळकर, खयामोद्दीन काझी, किशोर परदेशी,कमलाकर हेडे, धम्मा सरवदे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, गोविंद पोतंगले, रफीक गवळी, असलम शेख, शरद काळे,अकबर पठाण, मुन्ना वेडे, दत्ता हिरवे,संतोष चिमणे,अक्षय परदेशी आशिष ढेले, तौसिफ सिद्दीकी, यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ६० वर्षानंतर बंगालीपिंपळा-खळेगाव रस्ता कामास सुरुवात

## मच्छिंद्र गावडे यांच्या प्रयत्नाला यश



बीड/प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा ते खळेगाव गायकवाड जळगाव ते उमापूर हा १३ किमीचा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचे असून सार्वजनिक विभाग बीड अखत्यारित येतो. हा रस्ता गेल्या ६० वर्षापूर्वी म्हणजे १९७२ रोजी झालेला होता. या रस्त्यासाठी खळेगाव येथील ज्येष्ठ नागरिक मच्छिंद्र गावडे व भाऊसाहेब वळकुंडे यांच्या अथक परिश्रमानंतर रस्ता कामाला मंजूरी मिळाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता कामाला सुरू केली आहे

गेवराई तालुक्यातील जवळपास सर्वच गावातील रस्त्यांची अत्यंत दयनिय अवस्था पहावयास मिळते. अनेक रस्त्यावर बिले टाकून कामे न करताच बिले उचलण्याचा सपाटा गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत आहे. तशाच प्रकारे गेवराई तालुक्यातील खळेगाव ते बंगालीपिंपळा, गायकवाड जळगाव ते उमापूर हा एकूण १३ कि.मी. अंतराचा रस्ता गेल्या ६० वर्षांपासून झालेलाच नसून हा रस्ता चार सर्कलांना जोडणार मानला जातो. खळेगाव येथील ज्येष्ठ नागरिक मच्छिंद्र गावडे यांनी यांसह अनेक रस्ता कामासाठी मोठा संघर्ष उभा केलेला असून त्यांच्या अथक परिश्रमानंतर या रस्ता कामाला मंजुरी मिळाली असून रस्ता कामास सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरूवात केली आहे. या रस्ता कामामुळे जवळपास चार सर्कल मधील नागरिकांचा प्रवास सुखाचा होणार आहे. यामुळे मच्छिंद्र गावडे व त्यांच्या सर्व सहकार्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# अभिमान अर्बन पतसंस्थेच्या वतीने रक्तदान शिबिर

बीड/प्रतिनिधी

रक्तदान हे सर्व दानापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे अभिमान अर्बन पतसंस्थेने रक्तदान शिबिर घेऊन मोलाचे कार्य केले असून याची आम्हालाही मदत होणार आहे .रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी वारंवार अशी रक्तदान शिबिरे झाली पाहिजेत अशी अपेक्षा जिल्हा रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी यावेळी व्यक्त केली

मंगळवारी बीड शहरातील अरुण हॉस्पिटल जवळील आभिमान अर्बन पतसंस्था येथे रक्तदान शिबिर पार पडले.या शिबिराचे प्रमुख ऊद्धाघाटक बीड जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन आदरणीय डॉ. संजय(भाऊ) राऊत, कुंडलिक बाप्पु खांडे, हे



होते तर प्रमुख ऊपस्थिती सेवानिवृत्त प्राचार्य सोनवणे सर, डॉ.प्रा. सदाशिव बंड सर, पि.आय. माने सर, डॉ. राजेंद्र बंड , प्रा.कल्याण घोडके सर, प्रा.बनसोडे सर, प्रा.कुडके सर, प्रा. खांडे सर, प्रा. सोंडगे(खोसे) मँडम, प्रा.काळे सर, रोहन गायकवाड, सचस्कर , सुधीर काकडे या सर्वांच्या ऊपस्थितीमध्ये ऊद्घाटन संपन्न झाले. या ऊद्घाटन प्रसंगी रक्तदानाला सुरुवात अंकुश घोलप, श्रीनाथ घोडके, सचिन घोडके आणि काकासाहेब रहाडे,यांनी केली त्याबरोबरच बँकेचे सर्व कर्मचारी, व यशराज नाना मित्रमंडळाच्या अनेक मित्रमंडळींनी, मुकेश भैय्या, प्रविण मेम्बर पवार आणि अशा अनेक मित्र मंडळींनी दिवसभर रक्तदान केले, वरील सर्वांचाच बँकेतर्फे हृदयपुर्वक सत्कार करण्यात आला.आदरणीय सिव्हिल सर्जन डॉ. राऊत यांनी बँकेचे व संचालक मंडळाचे, कर्मचाऱ्यांचे खुप कौतुक केले.

## पान एक वरून

**रामटेक निवासस्थानी**

मी या बंगल्यात रहायला आले, याठिकाणी मुंडे साहेबांचा फोटो लागला आणि आपल्या सर्वांचे पांग फिटले. आज माझी आई इथे उपस्थित आहे, प्रत्येक आईला आपली मुलगी मोठी व्हावी असे वाटते. आपली मुलगी सर्वांच्या भल्यासाठी काम करत आहे असा विश्वास तीला आहे. आ. नमिताताई मुंदडा, माजी आमदार आर टी देशमुख, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, रमेश कराड, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की, राजेश्वर देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते श्रीहरी मुंडे, जीवराज ढाकणे, शिवाजीराव गुट्टे, जिल्ह्यातील सर्व सर्व आजी माजी तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, मंडल अध्यक्ष, बँकेचे संचालक, सरपंच, लोकप्रतिनिधींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**...अन्यथा करणार**

यांनी केलेल्या असंवेदनशील वक्तव्याचा सायबर पोलिसांनी कोणतीच संवेदना दाखवली नाही. व गुणही दाखल केला नाही. त्याच्यावर सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करावा. ,अंबाजोगाई शहर पोलिस स्टेशनची मनोज दादा जरांगे पाटला बद्दल मला उद्देशून असंवेदनशील अरेरावी वापरून त्यांच्या ड्राईवर मार्फत व्हीडीओ काढून वायरल केला त्यात तू जरांगेचा माणूस म्हणून वागतो जरांगेनी बीड जिल्ह्यात जाती जातीत तेढ निर्माण केला अशी जाती भेदाची भाषा वापरल्याने तमाम समाजाच्या व माझ्या भावना दुखावले आहे. या अनुषंगाने त्याच्यावर कायदेशीर करण्यात यावी अन्यथा मी आत्मदहन करणार आहे. याची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासन यांची राहील मला हे कृत्य करण्यास भाग पडणारा सुनिल नागरगोजे आहे. ही घटना दि.२०/०५/२०२५ रोजी ३ वाजता लातूर रोड सिद्धेश्वर ट्रेडर्स पशी ही घटना घडलेली आहे.

**आडस रोडवर ट्रक पुलात**

भीषण अपघात झाला यामध्ये तीन ठार तर चार जखमी झाले असे प्रकार घडत आहेत या मागचे मुख्य कारण म्हणजे दुचाकी गाडीला साईड ग्लास न बसवल्यामुळे यासारखे अपघात होत आहेत दुचाकीला कंपनी दोन्ही साईड ग्लास देते पण आज कालची फॅशन झाली आहे दुचाकी गाडीचे दोन्ही साईड ग्लास काढून टाकने कानामध्ये हेडफोन असल्यामुळे मागच्या गाडीच्या हॉर्नचा आवाज दुचाकीस्वाराला येत नाही आशा दुचाकी स्वरामुळे भीषण अपघात होत आहेत पोलीस प्रशासनाने साईड ग्लास नसलेल्या दुचाकी स्वरावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे असा सवाल जनतेतून होत आहे रोडच्या बाजूला घसरलेला ट्रक बाजूला काढून रोड मोकळा करण्यासाठी पाच तासाचा कालावधी गेला यामुळे या रोडवरती ये जा करणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले आहे.

**अज्ञात वाहनाच्या धडकेत**

अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अधिकाऱ्यांच्या या दिरंगाईमुळे वन्यजीव संरक्षणाकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी वन्यजीवप्रेमींकडून होत आहे.

**परळीतील रेल्वे उड्डाणपूल**

खड्ड्यामुळ दुरुस्ती करणे आवश्यक होते. दुरुस्तीचे हे काम २६ मे पासून सुरुवात होणार असून दुरुस्तीसाठी अडथळा निर्माण होऊ नये व काम करताना अपघात होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्था टोकवाडीवरून परळी कडे वळवण्यात येणार आहे. तरी वाहनधारकांसाठी पर्यायी मार्ग म्हणून परळी बायपास या मार्गाचा वापर करण्यात येणार आहे. शाममुखर्जी उड्डाणपूलावर नेहमीच वाहतूक कोंडी होत होती.यामुळे समाज माध्यमातून मोठ्या प्रमाणात नाराजी चा सूर येत होता. २६, मे ३०जून पर्यंत परळी कडे येणाऱ्या सर्व वाहनधारकांनी टोकवाडी, कनेरवाडी, परळी या दिशेने मार्ग खुला राहणार आहे. बीड तेलगाव मार्गे येणाऱ्या तसेच परभणी गंगाखेड कडून परळीला येणाऱ्या वाहन धारकांनी परळी बायपास रोडचा वापर करावा असे आवाहन राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, लातूरचे उपविभागीय अभियंता श.म.उरगुंडे यांनी केले आहे.

**बीडमध्ये पुन्हा गोळीबाराचा**

परिसरात एकच खळबळ उडाली असून, नेकनूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.लिंबागणेश परिसरातील महाजनवाडी येथील एका खासगी पवनचक्की कंपनीच्या मालकीच्या साहित्याची चोरी करण्यासाठी काही अज्ञात चोरटे रात्रीच्या सुमारास घटनास्थळी दाखल झाले होते. सुरक्षारक्षकाने त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवल्यानंतर त्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न करताच, त्याने इशारा देऊन चोरट्यांच्या दिशेने गोळीबार केला. गोळीबार झाल्यानंतर चोरटे घाबरून पळून गेले. तर यात एकाचा मृतदेह सापडला आहे. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, परिसराची पाहणी करून अधिक तपास सुरू केला आहे

**न्याय हक्कासाठी,शेतकऱ्यांचा**

धर्मांत पवित्र आसलेली गोमाताची कत्तल आज पर्यंत थांबलेली नाही त्यामुळे गोवंश कायदयात बदल करून कठोर अजामीन पात्र कायदा करण्यात यावा यामुळे दखल पात्र गुन्हा दाखल होईल व गो तस्कर यांना जरब बसेल ७) जायकवाड़ी धरणातुन राष्ट्रीय महामार्ग (छ्क)६१ च्या बाजुने पाण्याचा पाट काढण्यात यावा त्यामुळे असंख्ये गावातील पिण्याच्या व शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल ८)अमृतेश्वर महादेव मंदिर परिसर मौजे तांदळा शिवारातील दरयात धरण बाधण्यात यावे या मुळे मोठया प्रमाणात परिसरातील गावांचा शेती सिंचण व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल तसेच राष्ट्रीय महामार्ग छ्क ६१ कल्याण विशाका पटणम महामार्गा मध्ये शेतकरी वर्गाचे शेती गेलेली आहे त्या सर्व शेतकरी वर्गाला आर्थिक मोबदला तात्काळ देण्यात यावा. या उपोषणाची जनजागृती करण्यासाठी सरपंच नवनाथ गवते, सरपंच तुकाराम तळतकर, पत्रकार संतोष भारती, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल लोंढे,लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, अजय मोटे,ओमकार शेंबडे अदी १४० गावात जाऊन आंदोलनांची जनजागृती करत आहेत,या जनजागृती बैठकांना सभेचे स्वरूप प्राप्त होत आहे.

**कार्यकर्तृत्व दिग्गजांचा**

देऊन सत्कार करण्यात येणार आहे. आंबेडकरी समाजाच्या अडीअडचणीच्या काळात आपला जीव धोक्यात घालून आंबेडकरी चळवळीला योगदान दिलेल्या व्यक्तींचाही या सोहळ्यात गौरव करण्यात येईल.हा कार्यक्रम युवा नेते आदरणीय सचिन भाऊ कागदे यांच्या मित्र मंडळाच्या वतीने आणि कालवश ईश्वरजी कागदे सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार सोहळ्यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन दलित पँथर चळवळीतील सक्रिय लढाऊ भीमसैनिक पप्पू कागदे, सचिन कागदे, राहुल कागदे,सुनील कांबळे ,विधिज्ञ दिलीप (मामा) उजगरे यांचेसह सर्व संयोजकांनी केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## वेचक

### आयोगाचा कारभार म्हणजे 'वराती मागनं घोडं': रोहिणी खडसे

**पुणे :** पुण्यातील मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात रोज नवनवीन खुलासे होत असून वैष्णवीच्या आई-वडिलांकडून सासच्या लोकांवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आणि भाजपा महिला नेत्या चित्रा वाघ यांच्यावर शरद पवार गटाच्या रोहिणी खडसे यांनी जोरदार टीका केली आहे+++. रोहिणी खडसे यांनी म्हटले आहे की, "आपल्या महिला आयोगाचा कारभार हा असा आहे 'वराती मागनं घोडं'. बरं, बाईंचा आविर्भाव पण असा की जणू काही कोणत्या तरी चांगल्या कामासाठी देशाला संबोधित करत आहेत, अशी टीका त्यांनी केली. तसेच कालपरवा छगन भुजबळांनी मंत्रीपदाची शपथ घेतली असताना बाई सर्वात आधी स्वागतासाठी उभ्या होत्या. समोर मीडिया होती, पण त्यावेळी बाईंनी वैष्णवीच्या केसवर बोलणे टाळले. त्यामुळे या प्रतिक्रियेवर आम्हाला वाटते की 'दाल में कुछ काला है !' ही जबरदस्तीने द्यायला सांगितलेली प्रतिक्रिया आहे का? हा प्रश्न आमच्या मनात आहे," असंही रोहिणी खडसे यांनी म्हंटल आहे.



### सराफाला धमकी, पोलीस हवालदार निलंबित

**पुणे :** पोलीस दलातील वरिष्ठ अधिकार्याच्या नावाचा गैरवापर करून पोलीस हवालदाराने सराफाकडून ८ लाख २२ हजार २२० रूपयांचे दागिने खरेदी केले होते. त्यानंतर सराफाने दागिन्यांचे पैसे मागितल्यामुळे टाळाटाळ करीत त्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पोलीस हवालदाराला निलंबित केले आहे. गणेश जगताप (नेमणूक-विशेष शाखा) असे निलंबित केलेल्या हवालदाराचे नाव आहे. पोलीस उपायुक्त मिलींद मोहिते यांनी त्यांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत. पोलीस गॅझेटमधील आदेशानुसार, हवालदार गणेश जगताप यांची मुख्यालय ते विशेष शाखा अशी बदली ३१ जानेवारी २०२४ मध्ये झाली होती. ते संबंधित शाखेत हजर न होता, ते ६ फेबुरवारी २०२४ पासून रूग्णनिवदेन रजेवर गेले होते. त्यानंतर २१ ऑगस्ट २०२४ मध्ये जगतापने तक्रारदार सराफा मनीष सुरेश सोनिग्रा (रा. भवानी पेठ) यांच्या नवकार ज्वेलर्स शॉपमधून ८ लाख २२ हजार २२० रूपयांचे सोन्याचे दागिने खरेदी केले. दागिने खरेदीवेळी जगतापने पोलीस दलातील माजी वरिष्ठ अधिकार्याच्या नावाचा गैरवापर केला. त्यानंतर मनीषला दागिन्यांचे पैसे देण्यास टाळाटाळ केली. तक्रारदार मनीषने दागिन्यांच्या पैशांची मागणी केली असता, जगतापने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्याबाबतचा कसुरी अहवाल विशेष शाखेला प्राप्त झाला होता. बेजबाबदार, नैतिक अधःपतनाचे गैरवर्तन केल्याप्रकरणी हवालदार गणेश जगताप यांना निलंबित केले.

### 'तिरंगा यात्रा शौर्य, बलिदानाची एक झलक'

**पिंपरी :** ऑपरेशन सिंदूरमधील जवानांना अभिवादन करण्यासाठी बुधवारी रोजी पिंपरी-चिंचवड शहर काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वात गोकुळ हॉटेल ते पिंपरी चौक येथे तिरंगा यात्रा काढण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्यभर तिरंगा यात्रेचे आयोजन केले होते. जय जवान जय किसान, भारत माता की जय, वंदे मातरम, सेना हमारी शान है किसान हमारी जान है, अशा घोषणा देऊन सैनिकांच्या शौर्याचं स्मरण करत यात्रेचा समारोप भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी चौक येथे करण्यात आला. पहेलगाम येथे निष्पाप भारतीयांना दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळ्या चालवून मारण्यात आले. यासाठी भारत सरकारने भारतीय सैन्याच्या पराक्रमाने ऑपरेशन सिंधूर यशस्वीपणे राबविले. जल, वायू, स्थल या तिन्ही सैन्य दलाने देशाच्या संरक्षणासाठी दिवस रात्र लढा दिला. अशा सैनिकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी देशभर काँग्रेस पक्षाने तिरंगा यात्रा काढली आहे. या प्रसंगी शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, जेव्हा देशावर संकट आले तेव्हा अशा शूरवीरांनी आपल्या सर्व भारतीयांना सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्या प्राणाची आहुती देऊन देश सुरक्षित ठेवला आहे. संकटाच्या काळात काँग्रेस पक्ष नेहमी देशाबरोबर राहिला आहे.



# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे कामकाज शंभर टक्के झाले डिजिटल

## १ एप्रिल २०२५ पासून कागदविरहित प्रशासनाकडे यशस्वी वाटचाल



◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने एप्रिल २०२५ पासून कागदविरहित प्रशासनाकडे यशस्वी वाटचाल सुरू केली असून देशातील आधुनिक व स्मार्ट महानगरपालिका होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. महानगरपालिकेत दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली, कार्यप्रवाह प्रणाली वापरत १ एप्रिल २०२५ पासून ३१ हजारांहून जास्त कागदपत्र व ३ हजार ७१६ फाईल्सचे कामकाज डिजिटल पद्धतीने पूर्ण केले आहे. याशिवाय, सॅप, भौगोलिक माहिती प्रणाली आणि विविध नागरी व प्रशासकीय ॲप्लिकेशन्सच्या वापरामुळे महानगरपालिकेचे कामकाज अधिकच वेगवान झाले आहे.

महानगरपालिकेच्या सर्व ५४ विभागांमध्ये आता एकही फाईल्स फिजिकल पद्धतीने तयार केली जात नाही. फाईल्स तयार करण्यासाठी डीएमएस आणि वर्क फ्लो प्रणालीचा वापर केला जात आहे. डीएमएस प्रणालीचा वापर करून सर्व कागदपत्रांचे स्कॅनिंग, ट्रॅकिंग, सामायिकरण व शोध घेणे शक्य झाले आहे. तर, वर्क फ्लो प्रणालीमुळे प्रत्येक फाईलचे कामकाज वेळेत पूर्ण होत असून वेळेची बचत होत आहे.

प्रशासनाचे कामकाज पूर्णतः डिजिटल झाल्यामुळे निर्णयप्रक्रिया, पारदर्शकता व जबाबदारीत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रणालींच्या वापरामुळे स्मार्ट प्रशासन, पारदर्शक कामकाज या दिशेने महानगरपालिकेची यशस्वी वाटचाल सुरू असून महानगरपालिकेच्या सेवासुविधा नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचवण्यास देखील मदत होऊ लागली आहे.

### वेतन आणि बिलासाठी सॅप प्रणालीचा वापर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन व ठेकेदारांचे बिले काढण्यासाठी आता सॅप (SAP) प्रणालीचा वापर केला जात आहे. मार्च व एप्रिलमध्ये ६ हजार ५०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचे वेतन व ठेकेदारांचे बिले सॅप प्रणालीद्वारे काढण्यात आली आहेत. याशिवाय, महानगरपालिकेतील अभियांत्रिकी विभागांनी सॅप प्रणालीवर १७६ अंदाजपत्रके तयार केली असून, ही जीआयएस (GIS) डेटाबेसवर नोंदवली गेली आहेत. ज्यामुळे त्यांचे रिअल-टाइम ट्रॅकिंग शक्य झाले आहे. विवाह नोंदणी, क्रीडा मैदाने व सभागृह बुकिंग, झोपडपट्टी बिलिंग यांसारख्या नागरी सेवा देखील डिजिटल झाल्या आहेत.

### ५४ विभागांमध्ये १०० टक्के कागदविरहित कामकाज

- जीआयएस आधारित ईआरपी, सिंगल साईन ऑन (SSO) प्रणाली आणि एकत्रित डॅशबोर्ड यामुळे प्रत्येक फाईलची माहिती मिळविणे शक्य झाले आहे.
- ई-ऑफिस प्रणालीद्वारे ८ हजार ७४२ ई-मेल्स पाठवण्यात आले आहेत.
- १ हजार ७०९ डिजिटल सिग्नेचर की तयार करण्यात आल्या आहेत.

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात आता फिजिकल पद्धतीने फाईल एका विभागातून दुसऱ्या विभागात पाठवण्याची गरज राहिली नाही. महानगरपालिकेचे संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरुपात करण्यात आले असून यामुळे प्रशासनातील कामकाजाची गती, पारदर्शकता वाढली आहे. केवळ डिजिटल स्वरुपातील हा बदल नसून तो कार्यक्षमतेचा व विश्वासार्हतेचा प्रतीक आहे. या यंत्रणेमध्ये वापरकर्त्यांच्या अभिप्रायावरून सुधारणा देखील केल्या जात आहेत.

**- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### ई-गव्हर्नन्समध्ये होतेय ओळख निर्माण

३८० हून अधिक जीआयएस लेअर, भूआकृती विश्लेषणासाठी डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, ६ लाखांहून अधिक जिओटॅग केलेल्या मालमत्तांमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देशभरातील ई-गव्हर्नन्समध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. हाय रिझोल्यूशन सॅटेलाइट इमेज व सर्व्हेच्या आधारे ही प्रणाली विकसित असून महानगरपालिकेचे सर्व विभाग एकाच जीआयएस प्लॅटफॉर्मवर जोडले गेले आहेत. ही प्रणाली प्रधानमंत्री गतिशक्ती पोर्टलशी देखील जोडण्यात आलेली असून विविध विभागांमधील समन्वय आणि सर्वांगिण पायाभूत विकास नियोजन करण्यासाठी ती उपयुक्त ठरत आहे. याशिवाय जमीन नोंदी, सेवासुविधा, मालमत्तेची माहिती आदी नागरिकांना ऑनलाइन सहज उपलब्ध होत आहे. या माहितीसाठी आता कार्यालयात जाण्याची गरज नसल्याने वेळ, खर्चाची बचत होत असून कागदोपत्री कामकाज देखील कमी झाले आहे.

# माझी चूक असेल, तर फासावर लटकवा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा संताप

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**



वैशाली हगवणे प्रकरणात आपली उगाच बदनामी केली जात आहे. कुणाच्या लग्नाला जाणे ही माझी चूक आहे का? उगाच बदनामी करताय. माझी चूक असेल तर फासावर लटकवा, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी आपला संताप व्यक्त केला आहे.

वैशाली हगवणे च्या लग्नामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार फॉरच्युनर गाडीची चावी देतानाचा फोटो सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. त्यानंतर अजित पवारांवर निशाणा साधला. या प्रकरणात अजित पवार यांच्या वैष्णवी आणि शशांक यांच्या लग्नातील उपस्थितीवरूनही प्रश्न उपस्थित करण्यात आले.त्यानंतर त्यांनी तब्बल सहा दिवसांनतर त्यांनी आपली प्रतिक्रिया दिली

पवार म्हणाले, तुम्ही घरचे लोक आहात मी सांगतो, तुम्ही अनेक जण मला लग्नाला बोलावता. शक्य असेल तेवढे यायचा मी प्रयत्न करतो, त्या भागात असेन तर उशिरा का होईना. मी लग्नाला हजेरी लावतो. आता एखाद्या लग्नाला मी गेलो, आणि त्यांनी नंतर त्यांच्या सुनेला काही वेडवाकडे केले त्रास दिला तर तिथे माझा काय संबंध?, त्यांना मी सांगितलं का असं कर म्हणून?

मी लग्नाला गेलो, गाडीची चावी द्यायला सांगितली होती. मी देताना विचारलंही होतं. पण त्यांनी सुनेसोबत वाईट वर्तन केले तर माझा काय दोष?, आता कुणाच्या लग्नाला नाही गेलो तर अशी आफत येते. त्यामुळे कुणी लग्नाला न आल्याने नाराज होऊ नये. नालायक लोक माझ्या पक्षात नसतात. माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. असली माणसे माझ्या पक्षात नकोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

### राजेंद्र हगवणे यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात नवनवे खुलास होत असून माध्यमांमध्ये असलेल्या बातम्यानुसार वैष्णवीचे सासरे राजेंद्र हगवणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष असल्याचे समोर येत आहे. यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राजेंद्र हगवणे यांच्यावर बडतर्फची कारवाई करत पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी याबाबत माहिती दिली.

### कात्रज नवीन बोगद्यात अलीकडे दरड कोसळली

**पुणे :** पुण्याकडून खेड शिवापूरच्या दिशेला जाणाऱ्या कात्रज नवीन बोगद्याच्या अलीकडे मोठी दरड कोसळली. यामुळे रस्त्याच्या वाहतुकीवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. या दरडीमुळे जवळपास निम्मा रास्ता व्यापला आहे. मध्यरात्री झालेल्या जोरदार पावसात ही दरड कोसळल्याची माहिती येथे आलेल्या कर्मचाऱ्यांनी दिली. सकाळपासून याठिकाणी ढिगारा हटवण्याचे काम सुरू आहे.

### मोटारीच्या धडकेत शाळकरी मुलाचा मृत्यू

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

कोथरूड भागातील डीपी रस्त्यावर भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीवरील १२ वर्षीय शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातात दुचाकीस्वार आई जखमी झाली. अपघातानंतर घटनास्थळावरुन पसार झालेल्या मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अबीर प्रणव पानसे (वय १२, रा. चैतन्य हेल्थ क्लबजवळ, रामबाग कॉलनी,कोथरूड) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार प्रियंका प्रणव पानसे (वय ४४) या जखमी झाल्या. याबाबत प्रियंका यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक संदीप पवार यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अबीर हा कोथरूड भागातील एका शाळेत सातवीत शिकत होता. सोमवारी रात्री सव्वाआठच्या सुमारास दुचाकीस्वार प्रियंका यांच्यासोबत अबीर दुचाकीवरुन कोथरूड भागातील डीपी रस्त्यावरुन निघाला होता. शांतीबन सोसायटीकडून आशिष गार्डन चौकाकडे भरधाव वेगाने मोटार निघाली होती. भरधाव मोटारीने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार प्रियंका आणि सहप्रवासी अबीर यांना गंभीर दुखापत झाली. गंभीर जखमी झालेल्या अबीर आणि प्रियंका यांना नागरिकांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. उपचारांदरम्यान अबीरचा मंगळवारी रात्री मृत्यू झाला.

अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली.

# पावसाळ्यापूर्वी केलेली कामे पाण्यात

### महापालिकेच्या सफाईसाठी होती २६ कोटींची निविदा

◆ **पुणे (प्रतिनिधी):**

शहरात झालेल्या अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी फ्लॅश फ्लडची स्थिती निर्माण झाली होती. या पावसाने पालिकेने केलेल्या नालेसफाई आणि पावसाळी गटारांच्या सफाईवर पाणी फेरले आहे. पावसाच्या पाण्यामुळे सफाई केलेल्या सर्व ठिकाणी पुन्हा कचरा आणि माती गेल्याने येथे पुन्हा एकदा स्वच्छता करून घ्यावी लागणार आहे. पावसाळ्यापूर्वी ही कामे करण्यासाठी पालिकेने २६ कोटी ५० लाख रुपयांच्या निविदा काढल्या होत्या. त्यातील ७० टक्के कामही पूर्ण झाले होते. त्यामुळे पालिकेने केलेला खर्च पाण्यात गेला आहे.



"मध्यरात्री उशिरापर्यंत पालिकेचे कर्मचारी पाण्याचा निचरा करण्याचे काम करत होते. पावसाळी गटार, तसेच चेंबरमध्ये कचरा अडकल्याने पुन्हा एकदा शहरातील सर्व गटारे साफ करण्यात येतील.

**– पृथ्वीराज बी. पी.** (अतिरिक्त आयुक्त)

**४६ ठिकाणी साचले पाणी**

मंगळवारी पावसाने शहरात ४६ ठिकाणी पाणी साचले. या पाण्याच्या तक्रारी आल्यानंतर पालिकेकडून पाण्याचा निचरा करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयस्तरावर नेमलेली पथके पाठविली होती. या पथकांनी रात्री उशिरापर्यंत पाण्याचा निचरा केला. शहरासाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला होता. त्यामध्ये ६० मिमी ते १२० मिमी पाऊस पडण्याची शक्यता असते.

### चार ठिकाणी शंभरी पार

मंगळवारी दुपारी आणि रात्री अशा दोन टप्प्यांत मुसळधार पाऊस पडला आहे. वारजेमध्ये १२० मिमी, कर्वेनगर ११३ मिमी, सहकारनगर ११४ मिमी, सनसिटी सिंहगड रस्ता ११२ मिमी अशा चार ठिकाणी १०० पेक्षा अधिक मिमी पावसाची नोंद झाली. नांदेड सिटी ७९ मिमी, धायरी ६४ मिमी, मयूर कॉलनी ७५ मिमी, बावधन ८२ मिमी, महात्मा सोसायटी ९४ मिमी असा इतरत्र पाऊस झाल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. शहरात मुसळधार पाऊस पडल्यानंतर मदत कार्य करण्यासाठी व तुंबलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ७५० कर्मचारी काम करत होते, असा दावा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनूने यांनी केला.

### गडच्या रोहा एमआयडीसीत 'सीट्रिपलआयटी' मंजूर

**पुणे (प्रतिनिधी):** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारामुळे बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगरनंतर आता रायगड जिल्ह्यासाठी १०५ कोटी खर्चाचे 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी' मंजूर झाले आहेत. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने केंद्र मंजूरीचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले असून टाटा आणि राज्यशासनाच्या सहकार्यातून रोहा एमआयडीसी क्षेत्रात हे नवीन केंद्र उभे राहणार आहे. यामुळे रायगड जिल्ह्यातील युवकांना उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक 'एआय' तंत्रज्ञानासह रोजगाराभिमुख कौशल्यविकासाचे प्रशिक्षण मिळणार आहे. अजित पवार यांनी केंद्र मंजूरीसाठी केलेला पाठपुरावा आणि सहकार्याबद्दल राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे तसेच खासदार सुनील तटकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

# वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणी सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल

◆ **पुणे (प्रतिनिधि) :**



पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील भुकूम येथे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेते राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे हिचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. सुरुवातीला ही आत्महत्या असल्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, आता शवविच्छेदन अहवालातून धक्कादायक खुलासा झाला असून, वैष्णवीचा गळा दाबून खून केल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी हुंड्यासाठी छळ आणि सासरच्यांकडून होणाऱ्या जाचाला कंटाळून तिचा मृत्यू झाल्याचे समोर येत असून, सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात पती शशांक राजेंद्र हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा राजेंद्र हगवणे यांना अटक करण्यात आली आहे. तर सासरा आणि दीर फरार असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. दरम्यान, बुधवारी याबाबत राष्ट्रीय महिला आयोगाने दखल घेतली असून आयोगाच्या अध्यक्षा विजय रहाटकर यांनी याबाबत पोलीस महासंचालक यांना तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच याप्रकरणाचा तातडीने निष्पक्ष चौकशी करुन आरोपींना अटक करावी असे सांगितले आहे.

शुक्रवारी भुकूम येथील राहत्या घरी वैष्णवीचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला. प्राथमिकदृष्ट्या हे प्रकरण आत्महत्येचे वाटत होते. परंतु, शवविच्छेदन अहवालाने हे चित्र पूर्णपणे बदलले. अहवालातून तिच्या मृत्यूचे कारण गळा दाबणे असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या तपासात असेही समोर आले आहे की, वैष्णवीला हुंड्यासाठी छळले जात होते, तिला मारहाण केली जात होती आणि तिच्या शरीरावर मारहाणीचे व्रण होते. या पाच जणांविरुद्ध वैष्णवीला आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि हुंडाबळी घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### व्हायरल ऑडिओ क्लिप

वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिची तिच्या मैत्रिणीसोबतची एक ऑडिओ क्लिपही व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये ती "सगळ्यांना विरोध करून लग्न केलं ती चूकच झाली" असे बोलताना ऐकू येते. या ऑडिओ क्लिपमुळे वैष्णवी सासरच्या त्रासाला कंटाळली होती हे स्पष्ट होत आहे.

### लग्नात ५१ तोळे सोन्याचे दागिने, एक आलिशान फॉर्च्युनर गाडी

- मिळालेल्या माहितीनुसार, वैष्णवी आणि शशांक यांचा २०२३ मध्ये प्रेमविवाह झाला होता. वैष्णवीच्या माहेरच्यांनी लग्नासाठी सुसगाव येथील सनीज वर्ल्डमध्ये लाखो रुपये खर्च करून भव्य आणि शाही विवाहसोहळा आयोजित केला होता. लग्नात ५१ तोळे सोन्याचे दागिने, एक आलिशान फॉर्च्युनर गाडी आणि चांदीची भांडी भेट म्हणून दिली होती. लग्नानंतरही चांदीची मूर्ती, नुकताच दीड लाखांचा मोबाईल आणि माहेरी आल्यावर प्रत्येक वेळी पन्नास हजार ते एक लाख रुपये देण्यात आल्याचे सांगितले जाते. राजेंद्र तुकाराम हगवणे यांनी हे सर्व घेतल्याची माहिती एफआयआरमध्ये आहे.
- मात्र, लग्नाच्या काही दिवसांनंतरच सासरच्या लोकांनी वैष्णवीचा छळ सुरू केल्याचा आरोप आहे. लग्नात चांदीची भांडी पुरेशी मिळाली नाहीत या कारणावरून ते नाराज होते आणि तिला अपमानास्पद बोलत होते. त्यांनी तिच्या चारित्र्यावरही संशय घेऊन मानसिक आणि शारीरिक त्रास दिला. या छळात आणखी वाढ झाली, जेव्हा जमीन खरेदीसाठी दोन कोटी रुपयांची मागणी पूर्ण केली गेली नाही.

### मोठ्या सुनेचाही छळ झाल्याचे समोर

हगवणे कुटुंबाच्या छळाचा प्रकार केवळ वैष्णवीपुरता मर्यादित नसल्याचेही समोर आले आहे. त्यांच्या मोठ्या सुनेचाही सासरच्यांकडून अतोनात छळ करण्यात आला होता. मोठ्या सुनेने याच छळाला कंटाळून नोव्हेंबर २०२४ मध्ये पौड पोलीस स्टेशनमध्ये सासरे राजेंद्र हगवणे, सासू, दीर आणि नणंद यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी राजेंद्र हगवणे यांनी सुनेला कपडे फाटेपर्यंत मारहाण केली होती आणि मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले होते.

# डॉ. जयंत नारळीकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १० वी, १२ वीच्या विद्यार्थिंना शिष्यवृत्ती

### सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचा पुढाकार

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**



पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांना श्रद्धांजली वाहण्याकरिता सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने श्रद्धांजली सभेचे आयोजन केले होते. माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, अधिष्ठाता डॉ. प्रतीक्षा वाबळे, प्रा. मनीषा कुंभार यांच्यासह सर्व विभागाचे संचालक आणि प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "डॉ. नारळीकर आणि डॉ. मंगला नारळीकर यांचे 'सूर्यदत्त'शी जवळचे नाते होते. त्यांच्या निधनाने सूर्यदत्त परिवारास अत्यंत दुःख झाले आहे. डॉ. जयंत नारळीकर यांना २००८, तर डॉ. मंगला नारळीकर यांना २०१७ मध्ये 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले होते. डॉ. नारळीकर यांच्या मार्गदर्शनात 'सूर्यदत्त'च्या अनेक विभागाच्या वैज्ञानिक सहली 'आयुका'मध्ये नेण्यात आल्या होत्या. त्यांच्या उपस्थितीने हा संपूर्ण परिसर कुतूहलपूर्ण, शिकण्याजोगा आणि आदर्शवत झाला आहे. डॉ. नारळीकर 'सूर्यदत्त'मधील अनेक कार्यक्रमासाठी प्रेरणास्त्रोत म्हणून उपस्थित राहत. तर डॉ. मंगला नारळीकर यांच्या हस्ते आर्यभट्ट सभागृहाचे उदघाटन करण्यात आले होते. डॉ. नारळीकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी सीबीएसई व स्टेट बोर्डाच्या १० वी आणि १२ वी परीक्षेत विज्ञान विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे."


डॉ. दीपक शिकारपूर म्हणाले, "डॉ. जयंत नारळीकर यांच्यासमवेत टाटा इन्स्टिट्युटमध्ये काम करता आले; त्यांना जवळून अनुभवता आले, याबद्दल स्वतःला भाग्यवान समजतो. सर्वसामान्याकरिता विज्ञान, खगोलशास्त्र, गणित, अंतराळ विज्ञान यासारखे विषय त्यांनी अत्यंत सहजतेने समजावून सांगितले. सामान्यांपर्यंत ज्ञान पोहोचविता यावे, याकरिता अत्यंत तळमळीने त्यांनी कार्य केले. माझ्या लिखाणामागची प्रेरणा तेच आहेत. डॉ. नारळीकर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचेही अध्यक्ष होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी ऑनलाइन भाषण केले होते. 'सूर्यदत्त'ने त्यांच्या साहित्याचा गौरव करण्याकरिता साहित्य संमेलन भरविण्यात पुढाकार घ्यावा."


### पुणेकरांना विनामूल्य अनुभवता येणार दुर्मीळ वस्तूंचा खजिना

# आय.सी.एस.आर.आय.तर्फे आजपासून दुर्मीळ वस्तूंचे प्रदर्शन

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

येथील इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटमसतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्मिळ वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. २३,२४ आणि २५ मे २०२५ या कालावधीत हे प्रदर्शन होणार आहे. हिटलरचा पत्रव्यवहार, शंभर वर्षांपूर्वीच्या दिनदर्शिका, वेगवेगळ्या प्रकारचे माऊथ ऑर्गन हे यंदाच्या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण आहे, अशी माहिती प्रदर्शनाचे मुख्य समन्वयक श्याम मोटे आणि शशिकांत ढोणे यांनी गुरूवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटमसचे उपाध्यक्ष कमलेश मोतीवाले आणि सभासद चैतन्य ढोणे उपस्थित होते.






इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटमस् पुणेतर्फे 'छंदाव्दारे ज्ञान' या ब्रीदवाक्याला अनुसरून विविध विषयांवरील सुमारे ५० हून अधिक प्रदर्शने आयोजित केली आहेत. दिनांक २३, २४ आणि २५ मे २०२५ या कालावधीत बालगंधर्व कलादालनात आयोजित या प्रदर्शनात दुर्मिळ वस्तूंचा खजिना रसिकांना अनुभवता येणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार २३ मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजता भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदिप रावत यांच्या हस्ते होणार आहे.

छंदाव्दारे संचय, त्याचा अभ्यास आणि ज्ञान याद्वारे तरुणपिढीला आपला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे काम सोसायटी सातत्याने करीत आहे. इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटमस्तर्फे २००१ सालापासून एक वर्षाआड नाणकशास्त्र (नाणी व कागदी चलन आणि डाक तिकिटांचे प्रदर्शन प्रत्येक डिसेंबर महिन्यात भरविण्यात येते. तसेच दरवर्षी मे महिन्यात बालगंधर्व कलादालन येथे नाणी व डाक तिकिटे सोडून अन्य दुर्मीळ वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात येते. दुर्मीळ नाणी, डाक तिकिटे तसेच दुर्मीळ वस्तूंच्या संग्रहाचा छंद अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने ही प्रदर्शने सगळ्यांसाठी विनामूल्य खुली असतात.

# हुंडाबळीचा पुण्यात लांच्छनास्पद बळी

एकेकाळी विद्येचे माहेरघर अशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत ख्याती असलेल्या पुणे शहराच्या नावालौकिकाला, गौरवशाली परंपरेला गेल्या काही काळापासून ओहोटी लागलेली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवछत्रपतींचे बालपण या पुणे शहरामध्ये गेले आहे. महिला शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले, समाजसुधारक जोतिबा फुले यांच्या कार्याची मुहूर्तमेढ व उभी हयात या पुणे शहरामध्ये गेली. शिवछत्रपतींनंतर संभाजी महाराज, राजाराम महाराज, राणी ताराबाई यांच्यानंतर स्वराज्याची धुरा ज्या पेशव्यांनी सांभाळली, त्या पेशव्यांनी स्वराज्याचा कारभार याच पुण्यातील शनिवार वाड्यातून चालविला आहे. प्लेगसारख्या जीवघेण्या आजाराचा सामनाही याच पुणे शहराने खंबीरपणे केला. पुणे शहराच्या सावलीतच हाकेच्या अंतरावरील देहू-आळंदीमध्ये जगतगुरू संत तुकोबाराय, ज्ञानेश्वर माऊली यांनी वारकरी सांप्रदायाची सेवा केली. अभंग, हरिपाठ रचिले, विचारांची भिंत चालविली, रेड्यामुखी वेद बोलविले. असा नावलौकिक या पुणे शहराचा आहे. पण आज कधी कोयता गँग तर कधी अपहरण, कधी गोळीबार, कधी खंडणी युद्ध, राजकीय हत्या, अपहरण, रुग्णालयीन कारभाराचे गैरव्यवहार, तर कधी कुबेरपुत्रांकडून घडलेले अपघात अशा विविध घटनांनी पुणे शहराचा नावलौकिक इतिहासजमा होत चालला असून या शहराच्या वैभवाला, सांस्कृतिक इतिहासाला काळिमा फासण्याच्या घटना मोठ्या संख्येने घडू लागल्या आहेत. आता काहीसे वातावरण निवळत चालले असताना प्रेमविवाह केलेल्या वैष्णवीच्या आत्महत्येने पुन्हा वातावरण ढवळून निघाले असून पुणे शहर पुन्हा एकवार चर्चेच्या प्रकाशझोतात आले आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामुळे राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. वैष्णवी हगवणेने सासरी होणाऱ्या छळाला कंटाळून स्वतःचे आयुष्य संपवले असे म्हटले जात आहे. पण तिची हत्या झाल्याचा दावा वैष्णवीच्या घरचे करत आहेत. हुंड्यापायी वैष्णवीचा जीव गेल्याचे स्पष्ट झाले आहे. यादरम्यान वैष्णवीचा जाऊ मयूरीने हगवणे कुटुंबाबत धक्कादायक माहिती दिली आहे. मुळातच वैष्णवी आणि शशांक यांचा प्रेमविवाह झाला होता. प्रेमविवाह होण्यापूर्वी काही वर्षे उभयतांचे एकमेकांवर प्रेम होते. सासरच्या छळामुळे वैष्णवीने आत्महत्या केली असल्याचा सुरुवातीच्या काळात अंदाज व्यक्त केला जात असला तरी शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा संशय आता विविध घटकांकडून व्यक्त केला जावू लागल्याने हे प्रकरण काही वेगळेच निघण्याची शक्यता आहे.

हा प्रेमविवाह होता, परंतु हगवणे परिवाराची वाढती हाव व त्यातून वैष्णवीचा वाढत चाललेले छळ आणि या प्रेमविवाहाची अखेर आत्महत्येत झाली. वैष्णवी ही कस्पटे या सधन परिवारातील मुलगी होती. हुंड्यात मिळालेला निधी व त्यातून दोन कोटी रुपयांची मागणी, अन्य वस्तूंची मागणी पाहिल्यावर हा प्रेमविवाह नसून केवळ वैष्णवीच्या माहेरी असलेला पैसा लाटण्यासाठीच शशांक हगवणे याने प्रेमाच्या नावाखाली भुलविले असल्याचे, गळाला लावले असल्याचे स्पष्ट झाले आहे. सधन घरातील वैष्णवीने जर वेळीच आई-वडिलांचे म्हणणे ऐकले असते तर तिला आज जीव गमवावा लागला नसता, असा सूर आता पुणेकरांकडून आळविला जावू लागला आहे. वैष्णवीच्या लग्नाला तिच्या घरातल्यांनी म्हणजेच कस्पटे कुटुंबाने विरोध दर्शवला होता. मात्र वैष्णवीला शशांकशीच लग्न करायचे होते. अखेर वैष्णवीच्या नातेवाइकांनी कस्पटे परिवाराची समजूत काढल्यावर वैष्णवीच्या वडिलांनी थाटामाटात विवाह लावून दिला. हुंड्यामध्ये ५१ तोळे सोने, फॉर्च्युनर गाडी, चांदीची भांडी असे कस्पटे परिवाराने देऊनही हगवणे परिवाराचे समाधान झाले नाही. विवाहानंतर मात्र हगवणे कुटुंबाची हाव काही संपली नाही, उलट ती वाढतच गेली. विवाहाच्या वेळी १ लाख २० हजारांचे घड्याळ शशांकने मागून घेतले होते. त्यानंतर आता काही दिवसांपूर्वी जमीन घ्यायची असल्याचे सांगत शशांकने कस्पटे परिवाराकडे दोन कोटींची मागणी केली होती. ते पैसे न मिळाल्याने वैष्णवीचा छळ वाढत गेला. सासरच्या मंडळींकडून वैष्णवीला बेदम मारहाण होत असे. वैष्णवी गर्भवती राहिल्यावर तिच्या चारित्र्यावरच संशय घेण्यात आला. वैष्णवीचा मृत्यू गळ्याजवळ झालेल्या फासाने झाला आहे. पण तिच्या मृतदेहावर धारदार वस्तूने वार केल्याच्या अनेक जखमा देखील आढळून आल्या असल्याचे शवविच्छेजन अहवालामध्ये म्हटले आहे. वैष्णवीला हुंड्यावरून तिच्या सासरचे लोक त्रास देत होते, तिने आत्महत्या केली नसून तिचा खून झाला आहे असा वैष्णवीच्या वडिलांनी दावा केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी शशांक हगवणे (वैष्णवीचा पती), लता हगवणे (सासू) आणि करिष्मा हगवणे (नणंद) यांना अटक केली आहे. सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे फरार आहेत. वैष्णवीच्या नवऱ्याला हुंड्यात दिलेली आलिशान फॉर्च्यूनर कार पोलिसांनी जप्त केली आहे. मुळात कस्पटे परिवाराने विवाहात इतका खर्च केल्याने, दागिने, महागडी गाडी व अन्य वस्तूंची भेट दिल्यानेच हगवणे परिवाराचा स्वार्थ वाढत गेला. कस्पटे परिवाराने साधेपणाने विवाह करत महागड्या भेटवस्तू नाकारल्या असत्या तर हगवणे परिवारानेही अपेक्षा व्यक्त केल्या नसत्या. अर्थांत या सर्व जर-तरच्या आहेत. आता त्याला अर्थ नाही. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात वैष्णवीच्या रूपाने हुंडाबळीची घटना घडली आहे. एकीकडे कस्पटे या धनाढ्य कुटुंबाला आपली मुलगी गमवावी लागली तर प्रेमविवाहाच्या अट्टहासापायी घरच्यांचे म्हणणे न जुमानता चुकीच्या घराची निवड केल्याची किंमत वैष्णवीला आपले जीवन संपवून मोजावी लागली आहे. हगवणे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुळशी तालुकाध्यक्ष असले तरी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी हगवणे परिवाराला फटकारले आहे. संबंधितांच्या अटक करण्याचे निर्देश देऊन वैष्णवीच्या लहान मुलाला कस्पटे परिवाराच्या स्वाधीन करण्याच्या पोलिसांना सूचना दिल्या आहेत. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराता हुंडा देण्याघेण्याच्या घटना घडतात, त्यातून हुंडाबळीच्या घटना जन्माला येतात, हे सर्वच घृणास्पद आहे. अशा गोष्टी पुणे शहराच्या नावलौकिकाला शोभनीय नाहीत. प्रेमविवाहाची अखेर स्मशानाच्या मार्गावर गेल्याने हळहळ व्यक्त केली जात असली तरी राजकारणात वावरणाऱ्यांनी पैसाच्या लोभापायी घरातील सुनेचा अमानुष छळ केला. घराबाहेर जनसेवेचा चेहरा घेऊन वावरणारी मंडळी पैशाच्या हव्यासापायी घरातील सुनेवर अत्याचार करत होते. या घटनेतून प्रेमविवाह करणाऱ्यांनीही बोध घेणे आवश्यक आहे. या घटनांना वेळीच आवर बसणे काळाची गरज आहे. आपण सधन असलो तरी मुलीला प्रेमापायी काय द्यावे, किती द्यावे यालाही बंधने घालणे आवश्यक असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# चीनच्या संभाव्य अभद्र छायेत चिकन नेक?

भारतात पाकिस्तानतर्फे दहशतवादी कारवाया सतत चालू असतात. त्यामुळे भारताला पाक सीमेवर विशेषतः काश्मीर सीमेवर सतत सजग राहावे लागते. नुकत्याच पहलगाम हत्याकांडामुळे भारत व पाकमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती व आता युद्धविराम झाला असला तरी अद्यापही ते सावट कायम आहे. अशातच बांगलादेश चीनच्या मदतीने लालमोनीरहट विमानतळ सुरू करण्याच्या प्रयत्नात असल्याच्या चर्चेने भारत-बांगलादेश सीमेवरही अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यातही सिलीगुडी कॅरीडोर ज्याला चिकनेक असेही म्हणतात याला चीनकडून धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.






**सिलिगुडी कॅरीडोर**

सिलिगुडी हे पश्चिम बंगालच्या उत्तर भागात हिमालयाच्या पायथ्याशी महानंदा नदीवरील असलेले एक शहर असून ते कलकत्त्यापासून पाचशेसाठ किलोमीटर अंतरावर आहे. सिलिगुडी कॅरीडोर हा पश्चिम बंगालचा बांगलादेश व नेपाळ दरम्यानचा चिंचोळा मार्ग असून हा भाग ६० किमी लांब व २२ किमी रुंद आहे. या मार्गाची सर्वात अरुंद भागाची रुंदी केवळ २२ किमी आहे. कॅरिडोरच्या उत्तरेला भूतान आहे. या कॅरीडोरने पूर्वेकडील अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मीझोरम, नागालँड, त्रिपुरा भारताशी जोडलेले आहेत. म्हणून या मार्गाला ईशान्य भारताचे प्रवेशद्वार असेही म्हणतात. येथूनच जाणारा राजमार्ग व रेल्वे मार्ग पर्वोत्तर राज्यांना भारताशी जोडतो. या राज्यांशी दळणवळणाचा हाच एकमेव मार्ग आहे. हा संवेदनशील असल्याने याच्या रक्षणासाठी भारतीय सेना, सीमा सुरक्षा दल, आसाम रायफलशिवाय पंजाब पोलिसांची ही गस्त असते. या मार्गाला पर्याय म्हणून म्यानमारमधून मार्ग तयार करण्याची योजना आहे. या प्रस्ताविक मार्गात कलकत्ता ते म्यानमारच्या सितवे बंदरापर्यंत समुद्र मार्गे पुढे कलादान नदीद्वारे जमिनीपर्यंत व तिथून पुढे मिझोरमपर्यंत जमीन मार्ग असा हा प्रस्तावित मार्ग असून याची अद्याप केवळ चर्चा असल्याचे समजते.

**डोकलाम विवाद**

चीनचे विस्तारवादी धोरण असल्याने चीनचे आपल्या शेजारी राष्ट्रांशी सीमेसंदर्भात सतत वाद सुरू असतात. डोकलाम वाद त्याच प्रकारचा असून येथील चीनची उपस्थितीही भारताच्या संवेदनशील चिकन नेकच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरू शकते. डोकलांग हा भूतानचा चुंबी खोऱ्याच्या पठाराचा भाग आहे. २६९ किमी विस्तार असलेला हा भाग भारताच्या नथुला खिंडीपासून १५ किमी अंतरावर आहे. भारत, चीन व भूतान यांच्या सीमेवर हे ठिकाण असल्याने महत्त्वाचे आहे. मात्र चीन या भागावर आपला दावा सांगून कुरापती काढत असतो. १९६२ सालापासून या भागाबद्दल वाद सुरू आहे. १९८८ व ९८ मध्ये चीन व भूतान यांच्या दरम्यान या भागात शांतता प्रस्थापित ठेवण्यासंबंधी करार झाला. चीनची कुरापतखोर व विस्तारवादी वृत्ती पाहता २००७ मध्ये भूतानने भारतासोबत रक्षा व राष्ट्रीय हिताच्या संदर्भात परस्परांना सहकार्य करण्याचा करार केला. चीन व भूतानमधील शांतता करायला धडकवून चीनने २०१७ मध्ये डोकलांग सीमेनजीक रस्ते बांधणे व वस्त्या उभारण्याचे काम सुरू केले, त्याला भारताने विरोध करून ते काम बंद पाडले. ७२ दिवस चाललेल्या या संघर्षावर शेवटी चर्चेद्वारे तोडगा काढण्यात आला. मात्र या भागातील चीनची उपस्थिती व सैनिकी हालचाल भारताच्या चिकन नेक म्हणविणाऱ्या संवेदनशील भागाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने धोकादायक आहे.

**भालचंद्र ठोंबरे**

**अरुणाचल प्रदेशाबद्दलही चीनच्या कुरापती**

शिवाय अरुणाचल प्रदेशाबाबतही चीन नेहमीच कुरापती काढीत असतो. १९६२च्या युद्धात चिनने या प्रदेशावर आक्रमण करून तो जिंकल्याच्या दावा केला व नंतर प्रदेश सोडून मॅकमोहन लाईनपर्यंत मागे फिरला. परंतु तेव्हापासून चीन या प्रदेशावर सतत दावा ठोकत असतो. तसेच या अरुणाचल प्रदेशातील गावांची नद्यांची, डोंगरांची नावे बदलण्याचा एकतर्फा उद्योगही सुरू असतो. भारताने वेळोवेळी या सर्व गोष्टीला तीव्र विरोध केला आहे.

**चीनच्या मदतीने विमानतळाचे पुनरुज्जीवन**

आता बांगलादेशचा चीनच्या मदतीने बांगलादेशातील सहा विमानतळ पुनर्जीवित करण्याचा मानस आहे. यात ईश्वर्धी, ठाकूरगाव, समशेरनगर, बोगरा, कोमिल्लासोबत लालमोनीरहाट विमानतळ सुरू करण्याचा बांगलादेशचा मानस आहे. यासाठी चीनशी बोलणी सुरू असल्याची चर्चा आहे.

**लालमोनीरहाट**

हजार एकराच्यावर विस्तार असलेला बांगलादेशमधील हा विमानतळ इंग्रजांनी १९३१ मध्ये निर्माण केला होता. दुसऱ्या महायुद्धातही हे मित्र राष्ट्रांच्या फौजेसाठी एक महत्त्वाचे विमानतळ होते. भारत-पाकच्या विभाजनानंतर तत्कालीन पूर्व पाकिस्तानमधील हे विमानतळ काही वर्षे नागरी सेवेसाठी उपयोगात होते व त्यानंतर हे बंद करण्यात आले. हे विमानतळ भारताच्या सिलीगुडीपासून १३५ किलोमीटर अंतरावर आहे, तर भारताच्याच मेघालय राज्याच्या सीमेपासून केवळ अंदाजे १५ किलोमीटरवर आहे. अन्य पाच विमानतळांसह याही विमानतळाच्या पुनर्जिवनाचा बांगलादेशचा विचार आहे व त्यासाठी बांगलादेशने चीन पुढे प्रस्ताव ठेवल्याची चर्चा आहे.

**बांगलादेशचे चीनला आमंत्रण**

एक महिन्यापूर्वीच बांगलादेशच्या मोहम्मद युनूस यांनी चीनला भेट दिली व त्या भेटीदरम्यान त्यांनी चीनला बांगलादेशात आर्थिक विकासाच्या विस्ताराचे आमंत्रण दिले. त्यात मुख्यत्वे भारताच्या बांगलादेशच्या सीमेलगत असलेल्या सिलिगुडी या भाग जवळील भागाचा आर्थिक विस्तारासाठी समावेष आहे. यावेळी त्यांनी भारताच्या पूर्वोत्तर भागाबद्दलही वादग्रस्त विधाने केली आहेत.

**भारतासाठी डोकेदुखी**

चीनने स्वतःच्या सीमावर्ती भागात बहुसंख्य ठिकाणी दळणवळणाच्या सुविधा निर्माण करून संभाव्य युद्धकालीन परिस्थितीत जलद वाहतुकीच्या सुविधा निर्माण केल्या आहेत. चीनची कुरापती वृत्ती पाहता भारत-चीन सीमेवर युद्धजन्य परिस्थिती केव्हाही उद्‌भवू शकते. अशा वेळेस भारताच्या सीमेवर बांगलादेशात चीनने तळ निर्माण करणे भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परवडणारे नाही. प्रथम डोकलाम नंतर अरुणाचल प्रदेशाबद्दल कुरापती काढत असताना, आता बांगलादेशच्या आमंत्रणानुसार चीनने भारताच्या भागातील चिकननेक जवळील बांगलादेशच्या सिमेलगतेच्या भागात कोणत्याही स्वरूपात आपले अस्तित्व निर्माण केले, तर तेथून चीन भारताच्या हालचालीवर नजर ठेवू शकतो व त्यामुळे भारताच्या चिकन नेकवतर संभाव्य संकटाचे सावट गडद होत आहे व ही भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते.

# सोनाराच्या फसवणुकीवर ग्राहक न्यायालयाचा उतारा...



पूर्वी सोने स्वस्त होते. त्या काळी सुद्धा गुंजभर का होईना दर महिन्याला सोने विकत घेण्याची बऱ्याच कुटुंबांची पद्धत होती. कालांतराने गुंज हे वजनाचे माप मागे पडले, पुढे मिलिग्रॅम, त्याही पुढे तोळ्याच्या मापाने सुरू झाली. वास्तविक त्यावेळी सोने खरेदी ही लग्नसराईसाठी असायचीच पण अडीअडचणीच्या काळी सोने विकता येईल व त्यायोगे पैसे उभे करता येतील हा त्यामागील एक उद्देश असायचा. सोने लाखभर रुपये तोळा झाले तरी लग्नसराईसाठी अजूनही खरेदी केली जाते. खरेदीदाराला पूर्वी हे सोने विकताना अनंत अडचणींना सामोरे जावे लागायचे, जसे सोन्याचा कस किंवा कॅरेट, त्याची घट वगैरे. आता नवीन नियमानुसार ही पद्धत बऱ्यापैकी बदलली गेली, सोन्याचे हॉलमार्किंग केले जाते. त्यावर त्याचा कस त्या दागिन्यांवरच कोरलेला असल्यामुळे किमतीची घासाघीस करणे काही अंशी कमी झाले. हल्ली आपण गल्लोगल्ली सोनाराची दुकाने पाहतो. सोन्याच्या व्यवहारातील अनुचित व्यापारी प्रथा या अशा गल्लोगल्ली फोफावलेल्या सोनाराच्या दुकानांना जगवतात; परंतु आपण आज असे एक उदाहरण पाहणार आहोत जेथे नामांकित सोनारांसुद्धा अनुचित व्यापारी प्रथा वापरल्याबद्दल शासन करण्यात आले आहे.

हडपसर पुणे येथील आनंद आणि ऐश्वर्या रांजलकर यांनी पुणे येथील प्रख्यात पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स यांच्याकडून १८ डिसेंबर २०१७ रोजी हिऱ्याची बांगडी रु. ३.५९ लाखांना खरेदी केली. त्यावेळी काउंटरवर असलेल्या विक्रेत्याने असे सांगितले की आपण जेव्हा ही बांगडी विकण्यास जाल तेव्हा त्यावेळचा सोन्याचा दर तुम्हाला मिळेल मात्र त्यातून घडणावळ आणि १०% सर्वसाधारण चार्जेस वजा केले जातील. ही बाब त्यांना दिलेल्या बिलावरसुद्धा नमूद करण्यात आली; परंतु ९ जानेवारी २०२२ रोजी रांजलकर यांना ही बांगडी विकण्याची निकड भासली. प्रत्यक्ष बांगडी विकताना त्यांना जी रक्कम सांगण्यात आली ती पाहता त्यांना या व्यवहारात शंका आली. विक्रेता म्हणाला या बिलावर नमूद केलेल्या अटी आणि त्याव्यतिरिक्त असलेला एक रबर स्टॅम्प ज्यात असे म्हटले होते की वस्तूची अदलाबदल करायची असेल तर १००% किंमत ग्राह्य धरली जाईल आणि वस्तू विकायची असेल तर ९०% किंमत ग्राह्य धरली जाईल. रांजलकर यांना अर्थातच या अटीमुळे आर्थिक नुकसान सोसावे लागत होते. त्यांनी ज्वेलर्सकडून मिळालेल्या विक्री बिलाच्या आधारावर जिल्हा ग्राहक मंचाकडे तक्रार दाखल केली.

मेसर्स पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स यांनी मंचासमोर आपले म्हणणे मांडताना असे सांगितले की त्यांनी २४ नोव्हेंबर २०१७ रोजी 'सुलतान ऑफ डायमंड' सेल या स्कीममध्ये रु. ६५ हजार प्रति कॅरेट असलेल्या भावात सूट देऊन रु. ४९ हजार प्रति कॅरेट हा दर दिलेला होता आणि रांजलकर यांना कॅशियरकडे पैसे देण्यापूर्वी त्यांना हे स्टॅम्प असलेले बिल देण्यात आलेले होते. ते पाहूनच त्यांनी त्या रकमेचे प्रदान केलेले होते. सबब गाडगीळ यांनी कुठलीही चूक केलेली नाही त्यामुळे आता दागिना विकताना आलेल्या किमतीच्या तफावतीबद्दल त्यांना जबाबदार धरता येणार नाही. तसेच ९ जानेवारी २०२२ पूर्वी रांजलकर यांनी याबाबत कोणतीही तक्रार आमच्याकडे केलेली नाही.





**मधुसूदन जोशी**
मुंबई ग्राहक पंचायत

जिल्हा ग्राहक मंचाने असे म्हटले की, सोन्याची खरेदी करताना बिलावर ज्या अटी नमूद केलेल्या होत्या त्याव्यतिरिक्त रबर स्टॅम्प मारून नवीन अटींचा समावेश करणे हीच मुळी अनुचित व्यापारी प्रथा आहे. बिलावरील अट क्र. ५ कडे ग्राहक मंचाने लक्ष वेधले, ज्यात असे नमूद केले होते की हिरेजडित दागिना आणि सोने यांच्या पॉलिसीनुसार हिरेजडित दागिने यांच्या अदलाबदलीवेळी १००% किंमत ग्राह्य धरली जाईल व असा दागिना विक्री करताना ९०% रक्कम ग्राह्य धरली जाईल आणि त्यावेळी मूळ खरेदी बिल तसेच त्या उत्पादनाचे सर्टिफिकेशन असणे/करणे जरुरीचे आहे. शिवाय ही डायमंड पॉलिसी फक्त डायमंडयुक्त दागिन्यांच्या अदलाबदली आणि खरेदी विक्रीबाबत लागू राहील, डायमंड ज्वेलरी देऊन सोने किंवा चांदी यांची अदलाबदली अथवा त्यांची विक्रीसाठी हे नियम लागू असणार नाहीत. जिल्हा मंचाने असे म्हटले की, रबर स्टॅम्पवर नमूद केलेली अट ही अनुचित आहे, कारण अशी अट त्यांनी मुळात बिलावर छापायला हवी होती. विक्रेत्याने तोंडी सांगितलेल्या अटी व बिलावर छापलेल्या अटी यात तफावत आढळते सबब ज्वेलर्सने ही ग्राहकाकडून पूर्ण खरेदी सध्याच्या दरातून १०% वजावट (जी सर्वच ज्वेलर्स सरसकट करतात) करून पूर्ण करावी. शिवाय सरकारी करांच्या नावाखाली अधिकची रक्कम वसूल करणे चुकीचे आहे, असे करण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही. बिलावर अशा कोणत्याही कराची टक्केवारी नमूद नाही. जिल्हा ग्राहक मंचाने या बाबीचा निवाडा करताना ज्या गोष्टी नमूद करून निकाल दिला त्या खरोखरच दिशादर्शक आहेत.

या दाव्याचा निकाल पुणे जिल्हा ग्राहक मंचाने २ जानेवारी २०२५ रोजी दिला आणि रांजलकर यांना ४५ दिवसांत हा विक्री व्यवहार पूर्ण करण्यास सांगितले. मेसर्स पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स यांना ग्राहकास नुकसानभरपाई पोटी रु ३० हजार व दाव्याचा खर्च रु ७००० देण्याचे आदेश पारित केले. या दाव्याची सद्यस्थिती म्हणजे रांजलकर यांनी या निकालाच्या अंमलबजावणीसाठी ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम ७१ आणि ७२ अनुसार अर्ज दाखल केला आहे. मात्र मेसर्स पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स यांच्याकडून कोणताही प्रतिदावा अद्याप दाखल नाही. ग्राहक म्हणून आपण सजग राहायला हवे हे फक्त दागिन्यांच्या बाबतीतच नव्हे तर आपण खरेदी करत असेल्या प्रत्येक वस्तूच्या बिलाची मागणी करणे, त्यावरील अटी-शर्ती नीट पाहून आणि त्या अमान्य असतील तर त्याबाबत विक्रेत्याकडे त्यावेळी योग्य करण्याची खबरदारी घ्यायला हवी.

mgpshikshan@gmail.com

## राशिभविष्य

शुक्रवार, दि. २३ मे, २०२५

### || पंचांग ||

आज मिती वैशाख कृष्ण एकादशी शके १९४७, चंद्र नक्षत्र उत्तरा भाद्रपदा, योग प्रीती, चंद्र राशी मीन. भारतीय सौर २ ज्येष्ठ शके १९४७ म्हणजेच शुक्रवार दि. २३ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०१ मुंबईचा सूर्यास्त ७.०८, मुंबईचा चंद्रोदय ३.२१, उद्याची मुंबईचा चंद्रास्त ३.१५, राहू काळ १०.५६ ते १२.३५, अपरा एकादशी, शुभ दिवस

### || भविष्य ||

**मेष** : कामातील अडथळे दूर होतील.

**वृषभ** : मनावरील ताण निघून जाणार आहे.

**मिथुन** : आर्थिक लाभ होणार आहेत.

**कर्क** : प्रगतीला पोषक वातावरण असणार आहे.

**सिंह** : मनावर उगाचच ताण असण्याची शक्यता आहे.

**कन्या** : व्यवसायामध्ये चांगले वातावरण असणार आहे.

**तूळ** : सरकारी कामे करून घ्या. अडचणी जाणवणार नाहीत.

**वृश्चिक** : सामाजिक प्रतिष्ठा मिळणार आहे.

**धनू** : आर्थिक फायदे मिळतील.

**मकर** : नवीन मार्ग मिळतील.

**कुंभ** : मानसिक चिंता वाटणार आहे.

**मीन** : नवीन योजना कार्यान्वित होऊ शकतात.

### मुंबईतून गोमातांची हकालपट्टी करण्याचा डाव

गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईत गोठ्यांतील गाई भाड्याने घेऊन त्या भाविकांच्या श्रद्धापूर्तीसाठी दुपारी १ वाजेपर्यंत मंदिरांच्या दाराशी बांधण्याचा प्रघात आहे. मंदिरात येणारे भाविक देवदर्शनाबरोबरच तेथील गोमातेलाही मनोभावे चारा घालून मार्गस्थ होत असतात. परंतु आता, मुंबई महापालिकेने मुंबईतील गुरांचे गोठे मुंबईबाहेर पाठवण्याची एक पाताळयंत्री योजना आखली आहे. मुंबईत असंख्य गोठे आहेत. गोठ्यांच्या मोठ्या जमिनींवर विकासकांची वक्रदृष्टी वळली आहे. महापालिका त्यांच्या दिमतीला आहेच. ते गोठे सरळमार्गी हटविण्याची कार्यवाही करण्याऐवजी गाईवाल्यांनाच मंदिरांबाहेर गाई घेऊन बसण्यास आणि गोठेवाल्यांना गाई बाहेर पाठवण्यास पालिकेने प्रतिबंध केला आहे. त्यामुळे गरीब गाईवाल्यांची रोजीरोटी बंद झाली आहे. गोठेवाल्यांनाही गाईंच्या पोषणाचा खर्च परवडत नाही. बिचारे गरीब गायवाले धास्तावले आहेत. राजकीय नेत्यांचे उंबरठे झिजवत आहेत. पण त्या बिचाऱ्यांची कोणीच दखल घेत नाही. गोठ्यांच्या मोठ्या जमिनींवर डोळा ठेवणाऱ्या विकासकांवर मेहेरबान होण्यासाठी पालिकेचे हे चाळे आहेत.

– **उल्हास गुहागरकर,** गिरगाव

### नेमेचि येतात पावसाळी संकटे

प्रशासनाचा गलथान कारभार आणि माणसाच्या निसर्गावर कुरघोडी करण्याच्या वाढत्या बेगुमान वृत्तीने, नेमेचि न येणाऱ्या मान्सूनपूर्व पावसानेच कशी दाणादाण उडवली आहे याचा दारुण प्रत्यय सध्याच्या अवकाळी पावसाने येत आहे. 'नेमेचि येतो पावसाळा हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा! 'ही कवी कल्पना खरेच आता कालबाह्य ठरू पाहात आहे! तो कधी येईल, कसा येईल याचा आता नेम राहिलेला नाही! तो कधी घशाला कोरड पाडतो तर कधी नाका-तोंडात पाणी जाईपर्यंत बरसतो. याला सर्वस्वी मानवी वृत्तीच जबाबदार आहे. मान्सूनपूर्व येणारा मर्यादित स्वरूपाचा अवकाळी पाऊस बळीराजाला जमिनीच्या मशागतीसाठी उपयुक्त ठरत असला तरी, त्याच्या अतिरेकाने हाताशी आलेल्या काही नगदी पिकांचे प्रचंड नुकसान होत आहे. जीवित व वित्तहानीचे भयंकर प्रसंग ओढवत आहेत. ही गंभीर बाब आहे. पर्यावरणाचे संवर्धन दूरच, पर्यावरणाचे रक्षण सुद्धा मानवाच्या हातून घडत नाही आणि म्हणूनच नेहमीची उडणारी दाणादाण हा त्याचाच परिपाक आहे.

– **श्रीकांत मा. जाधव,** सातारा

जनसंवाद

### देशातील सिंहांची संख्या वाढतेय...

बिग कॅट अर्थात महामार्जार प्रजातीच्या प्राणीकुळातील सर्वात बलवान, नितांतसुंदर व देखणा आणि जंगलचा राजा म्हणून मिरवणाऱ्या सिंहाच्या बाबतीत एक सुखद बातमी आली आहे. भारतातील गुजरात राज्यातील सासण गीर वन्यजीव अभयारण्यात गेल्या काही वर्षांपासून सिंहांची संख्या वाढत आहे. या बातमीने वन्यजीवप्रेमींचे मन आनंदाने बहरून गेले आहे. बुद्ध पौर्णिमेच्या तेजस्वी चंद्रप्रकाशात 'पूनम अवलोकन' नावाच्या पारंपरिक पद्धतीने अलीकडेच सिंहांचे निरीक्षण आणि गणना करण्यात आली. त्यानुसार सिंहांच्या २०२० सालच्या ६७४ च्या संख्येत एकूण २१७ सिंहांची वाढ होऊन सिंहांची संख्या ८९१ वर पोहोचली आहे. म्हणजेच त्यांच्या संख्येत टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली आहे. शंभर वर्षांपूर्वी जगभरात सुमारे दोन लाख सिंह होते. सिंहांची प्रचंड शिकार आणि त्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे सध्या ती संख्या वीस हजारांवर आली आहे. त्यापैकी सर्वाधिक १४ हजार ५०० सिंह टांझानिया या देशात आहेत. जगात सिंहाची संख्या अशा प्रकारे अनेक कारणांनी झपाट्याने कमी होत असताना आणि धोक्यात असलेल्या प्रजातीमध्ये सिंहाचा समावेश झालेला असताना भारतातील सिंहांच्या संवर्धनाच्या योजनांमुळे भारतात सिंहांची संख्या वाढतेय ही खरेच अभिमानाची गोष्ट आहे.

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### अणुऊर्जा क्षेत्राचे अधर्व्यू काळाच्या पडद्याआड

विज्ञान महर्षी डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनापाठोपाठ ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण एम. आर. श्रीनिवासन यांच्या निधनाची बातमी आल्याने विज्ञानप्रेमींना मोठा धक्का बसला आहे. कारण एम. आर. श्रीनिवासन यांनी अणुऊर्जा क्षेत्रात जे कार्य केले आहे ते अद्वितीय असे आहे. भारताला आण्विक आणि अणुऊर्जा संपन्न राष्ट्र करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. भारताच्या अणुऊर्जेचे प्रणेते असलेल्या डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अणुऊर्जा विभागात काम करण्यास सुरुवात केली. देशाच्या पहिल्या अणुऊर्जा केंद्राच्या निर्मिती प्रकल्पात त्यांनी मुख्य अभियंता ही जबाबदारी पाडली. १९६७ मध्ये तत्कालीन मद्रास येथे उभारण्यात आलेल्या अणुऊर्जा प्रकल्पातही त्यांचा मोलाचा वाटा होता. भारतीय अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्षपद आणि अणुऊर्जा विभागाचे सचिवपदही त्यांनी सांभाळले. त्यांच्या निधनाने भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांचे कार्य नव्या पिढीला प्रेरणादायी असेच आहे. एम. आर. श्रीनिवासन यांच्या निधनाने भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राचे अध्वर्यू काळाच्या पडद्याआड गेले आहे. एम. आर. श्रीनिवासन यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

– **श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा, पुणे

### परदेश वारीने नेमकं काय 'साध्य' होणार?

शस्त्रसंधी झाल्यानंतर केंद्र सरकारने भारताची भूमिका जगाला समजून सांगण्यासाठी विविध देशांत सात शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय घेतला आणि यात सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, पूर्व राजदूत, नोकरशहा यांचा समावेश केला गेला आणि यातील पहिले शिष्टमंडळ नुकतेच परदेशी रवाना झाले. शशी थरूर हे आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेले नाव आहे, त्यांनी अमेरिका, युनो यामध्ये काम केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम केले आहे. परराष्ट्र राज्यमंत्री म्हणूनही ते होते. त्यांचा नक्कीच चांगला उपयोग होऊ शकतो. मात्र शिष्टमंडळावरुन देशातच कलगीतुरा रंगला. कारण एकमत झाले नाही. पाक दहशतवादी देश आहे हे जगजाहीर आहे. पाक पुरस्कृत दहशतवादाची झळ अमेरिकेला देखील बसली आहे. पाकच्या दहशतवादी भूमिकेचे अनेक मुस्लीम राष्ट्र देखील समर्थन करत नाही. पाकबाबत अनेक देशांचे मत चांगले नसले तरी ऐनवेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बाजू घेतली जाते हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. चीन तर उघडपणे पाकची पाठराखण करतो. भारताच्या बाजूने केवळ तालिबानी आणि ईस्त्रायल उभे ठाकले ते देखील हातचे राखून. गेल्या दहा-बारा वर्षांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवळपास ८० परदेशी दौरे करत ७०-७२ देशांना भेटले. सर्वाधिक दहा वेळा अमेरिका, सहा वेळा चीनचा दौरा केला. अनेकदा रशियाला गेले. मात्र ऐनवेळी भारताच्या बाजूने कोणी उभे राहिले नाही हे वास्तव आहे. भारताची बाजू मांडली जावी यासाठी शिष्टमंडळ पाठवले गेले ते चांगलेच झाले मात्र आजची परिस्थिती पाहता याचा कितपत फायदा होईल? शिष्टमंडळ तेथे जाऊन कोणाला भेटणार, कोणापुढे बाजू मांडणार आणि यात किती यश मिळेल हे सगळेच अनिश्चित आहे. त्यातूनही भारतातच एकवाक्यता नाही. गेल्या काही वर्षांपासून अशिया खंडात भारत एकटा पडू लागला आहे. जवळपास सर्वच शेजारील देशांशी भारताचे सलोख्याचे संबंध राहिलेले नाहीत. अमेरिकेच्या नादाला लागून आपण आपला पारंपरिक सच्चा मित्र रशियाला दुखावत आहोत का? याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. आपले परराष्ट्र धोरण कुठेतरी चुकते आहे का, याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. गेलेच आहे तर शिष्टमंडळाने काहीतरी पदरात पाडून यावे.

– **अनंत बोरसे,** ठाणे

# बीडमध्ये आज तिरंगा रॅलीचे आयोजन

**आवाहन** | **मंत्री संजयजी शिरसाटांची प्रमुख उपस्थिती**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:सीमेपलीकडून वारंवार होणाऱ्या भ्याड हल्ल्यांना भारतीय सैन्याने दिलेले रोकठोक प्रत्युत्तर हे केवळ युद्धाचे नव्हे तर भारतमातेच्या वीर पुत्रांची शौर्यगाथा लिहिणारे आहे. या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात आज दि. २४ मे २०२५ रोजी सकाळी १०. ०० वाजता देशभक्तीने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली असून या ऐतिहासिक रॅलीस महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

ही रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुरू होईल.



त्यानंतर सुभाष रोड मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यात येणार आहे. शेवटी सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली वाहून रॅलीचा समारोप होईल. या रॅलीमध्ये हजारो तरुण मोटारसायकलवर तिरंगा झेंडा हाती घेऊन सहभागी होणार आहेत. हे आयोजन केवळ एक कार्यक्रम नसून, जवानांच्या शौर्याला मानवंदना देणारी आणि एकतेची भावना जागवणारी लोकचळवळ ठरणार आहे.

### चला एक होऊ देशासाठी: जगताप, मुळूक, गलधर

देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी शूरवीर जवान आपल्या प्राणांची आहुती देतात. त्या शूरवीरांना आपण एक सुजाण भारतीय नागरिक असल्या नात्याने एकत्रित येऊन वंदन करायला हवे. ही तिरंगा रॅली आपल्या सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण आणि त्यांच्या शौर्याची गाथा गाण्याचा एक पवित्र क्षण असणार आहे. यामुळे बीडवासियांनी जास्तीतजास्त संख्येने तिरंगा रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी तमाम बीडवासियांना केले आहे.

## चिंचोली माळीत भुरटे पुढारी वाढले ?

**चर्चा: सरपंच पदासाठी मनमानी कारभार**

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील सरपंच पदाचे आरक्षण ओबीसीला सुटले असुन चिंचोली माळीत ओबीसीचे भुरटे पुढारी गल्लीछ राजकारण करत आहेत त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना खुप मोठ्या प्रमाणात अशा गलिच्छ राजकारणाच्या झळा सर्वसामान्य नागरिकांना सहन कराव्या लागत आहेत तसेच छोट्या मोठ्या कामात अडथळा निर्माण ~~करणे चालत आलेल्या रुढी परंपरा यांना~~ विरोध करणे असल्या प्रकारचे राजकारण चिंचोली माळी येथील ओबीसीचे भुरटे पुढारी करत आहेत काही उंटावर बसून शेळ्या हाकत आहेत तसेच काही भुरटे पुढारी स्वताला समाजाचा नेता समजून इतर समाजाला टारगेट करायला सुरुवात केली आहे त्यामुळे गावातील राजकारण, समाजकारणाचे वातावरण अत्यंत दुषीत झाले आहे तसेच त्यांच्या मदतीला काही मराठ्यांचे भुरटे पुढारी सुध्दा शामील झाले आहेत त्यामुळे चिंचोली माळी येथील वातावरण खुप भयानक बनले आहे व काही दिवस असे वातावरण चिंचोली माळी येथील राहीले तर कलम १४४ प्रशासनाला लागु करावे लागेल तरी चिंचोली माळी येथील परीस्थिती पहात प्रशासनाने तातडीने चिंचोली माळी येथील घडणाऱ्या घटनांवर कार्यवाही केली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## ...अवैध धंद्यांकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष

**कारवाई:वाळूचा हायवा पकडला पण चालक फरार**

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:तालुक्यातील धामणगांव, पाटण सांगवी परिसरातील डांबरी रस्त्यावर अवैध्यरित्या वाळूची चोरटी वाहतूक करणारा उभा असलेला हायवा चार ब्रास वाळूसह पोलिसांकडून जप्त करण्यात आला. परंतु हायवा चालक मात्र वाहन सोडून पळून गेल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.

आष्टी तालुक्यातील धामणगांवकडून पाटण सांगवीकडे येणाऱ्या डांबरी रस्त्यावर गुरुवार दि. २२ रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास अवैध्यरित्या वाळूची चोरटी वाहतूक करणारा (एम. एच. १७-सी व्ही-३४६८) असा क्रमांकचा उभा असलेला हायवाआष्टी पोलिसांकडून जप्त करण्यात आला आहे. या हायवामध्ये चाळीस हजार रुपये किमतीची चार ब्रास अवैध वाळू व पंधरा लाखाचा हायवा जप्त करून पोशि मजरुद्दीन सय्यद यांच्या फिर्यादीवरून पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोहकॉ प्रवीण क्षीरसागर करीत आहेत. परंतु तालुक्यातील इतर अवैध धंद्याकडे मात्र पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष्य होत असल्याचे नागरिकांत बोलल जात आहे.

## पाटोद्यात गुणवंतांचा गुणगौरव सोहळा

**आवाहन:आ.सुरेश धसांच्या हस्ते सत्कार**

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:पाटोदा मेहनत, चिकाटी आणि दृढनिश्चयाच्या जोरावर यश मिळवलेल्या दोन गुणवंत यशस्विनींचा कु.ऋचा विठ्ठल कुलकर्णी व कु. मृणाली मिलिंद कुलकर्णी यांचा गौरव सोहळा रविवार, दिनांक २५ मे रोजी सकाळी ११ वाजता श्री रेणुका माता मंदिर, पाटोदा येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.या कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांच्या हस्ते या दोघींचा सत्कार होणार असून, त्यांच्या यशाचा गौरव संपूर्ण पाटोदा तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



कु. ऋचा कुलकर्णी यांनी MPSC मार्फत JMFC (Judicial Magistrate First Class) परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळवत न्यायाधीश पदावर निवड मिळवली आहे. तर कु. मृणाली कुलकर्णी यांनी स्पर्धात्मक परीक्षेत यश संपादन करून स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये असिस्टंट मॅनेजर पदावर नियुक्ती मिळवली आहे. या गौरव सोहळ्याचे आयोजन सर्व ब्राह्मण समाज, पाटोदा यांच्यावतीने करण्यात आले असून, कार्यक्रमानंतर इंजी. किरणकुमार देशमुख (पाटोदा) यांच्या सौजन्याने सर्व उपस्थितांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.या प्रेरणादायी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## मस्साजोग येथील एमआरजीएसमधून करण्यात आलेली विहीरच गेली चोरीला

**कागदोपत्री लाभार्थी असलेल्या मिथुन देशमुख यांची प्रशासनाकडे धाव**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: शासनाकडून शेतकर्यांना एमआरजीएसच्या माध्यमातून विहीरी देवून शेतकर्यांची प्रगती वाढविण्याचे काम केले जाते मात्र या कामात शासनाचेच कर्मचारी बोगसगिरी करत कोट्यावधीचा माया कमविण्याचे काम केले आहे. मस्साजोगच्या मिथून देशमुख यांच्या शेतामध्ये एमआरजीएसची विहीर दाखवत ग्रामसेवक व रोजगार सेवकाकडून चक्क विहीर न खोदकाम करताच बिले उचलण्याचे काम केल्याची तक्रारी शेतकरी मिथून देशमुख यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील गट नं २५/२ ब मधील ०.६१ आर एवढे क्षेत्र असलेल्या जमीनीमध्ये विहीर मंजूर करत विहीरीचे कसल्याही प्रकारचे काम न करताच पैसे उचलण्याचे काम येथील ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवकाकडून करण्यात आला आहे. मिथून देशमुख हे काही वर्षापासून आई वडील आजारी असल्याने बीड येथे राहण्यास आले आहेत. वडील गंभीर आजारी असल्याने २०२३-२४ या वर्षामध्ये गावातील शेतामध्ये जाणे अल्प झाले. या काळातच येथील ग्रामसेवक दत्तात्रय गव्हाणे, ग्रामरोजगार सेवक अमोल बळीराम बनसोडे या दोघांनी हातमिळवणी करून मिथून देशमुख यांच्या शेतात विहीर मंजूर केली. यासाठी लागणार्या मिथून देशमुखचा जीओ टॅग फोटो त्याला त्याच्या शेतातील शेजारी असलेल्या नदी खोली करणाला लागत असल्याचे सांगून बांधावर फोटो घेण्यात आला. त्यानंतर या दोघांनी शेतकरी मिथून देशमुख यांना विहीरबाबत कसलीही कल्पना न होवू देता, संपूर्ण विहीर बोगस दाखवत बिले उचलण्याचे काम केले. याबाबत मिथून देशमुख यांनी विचारणा केली असता उडवाउडवीचे उत्तर देत काही पैसे घेवून गप्प राहण्याची धमकी दिली. यानंतर मिथून देशमुख यांनी पंचायत समितीच्या तत्कालीन बिडीओ मोराळै यांची भेट घेवून सर्व प्रकार सांगितला मात्र या बोगसगिरीत यांचाही हात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शेतकरी देशमुख यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली असून यामध्ये त्यांनी माझी विहीरच चोरीला गेली असल्याचे म्हटले आहे. यामुळे जिल्हा खळबळ उडाली आहे.

### शासनाच्या निधीचा सावळा गोंधळ

शासनाकडून पगार घेत शासनाची इमाने इतबारे काम करणे ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवकांचे काम असतांनाही मस्साजोग येथील ग्रामसेवक गव्हाणे व ग्रामरोजगार सेवक बनसोडे यांनी चक्क शासनाचा निधी हडप करण्याचे काम केले आहे. या बोगस कर्मचार्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### मजूरांचे नावे बोगस

एमआरजीएस अंतर्गत करण्यात आलेल्या अनेक विहीरींच्या कामामध्ये बोगस मजूरांचे नावे दाखवत निधी हडप करण्याचे काम ग्रामसेवक व रोजगार सेवकाकडून करण्यात येत असल्याचे या घटनेतून उघडकीस आले आहे. मिथून देशमुख यांची नावाने करण्यात आलेल्या विहीरीचा संपूर्ण निधी हडपण्याचे काम रोजगार सेवक व ग्रामसेवक यांनी केले आहे.

### खोटे गुन्हे दाखल करून जीवे मारण्याच्या धमक्या

येथील अधिकारी कर्मचार्यांकडून एमआरजीएस अंतर्गत करण्यात आलेले कामे बोगस असल्याची तक्रार मिथुन देशमुख जिल्हा प्रशासनाकडे दिल्यानंतर अधिकारी कर्मचार्यांकडून गावातील काही लोकांना हाताशी घेवून सोशल मिडीयाच्या माध्यमातून तसेच फोन करत जीवे मारण्याची धमकी दिली जात असल्याची तक्रारधार देशमुख यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर गावातील काही लोकांना पुढे करत खोटे गुन्हेही दाखल करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

## पिकपची दुचाकीला धडक

**अपघात:तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू**

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:बहिणीला दवाखान्यात भेटण्यासाठी नगरला चाललेल्या तरुणाच्या दुचाकीला समोरून भरधाव आलेल्या पिकप वाहनाने धडक दिली. अपघातात सुनील नवनाथ ससाणे -वय ३० (रा. खाकाळवाडी ता. आष्टी) या तरुणाचा अहिल्यानगरच्या दवाखान्यात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी पाच ते साडेपाच वाजेच्या सुमारास वाघळूज शिवारात घडली.

आष्टी- नगर मार्गांवरील वाघळूज शिवारात सकाळी नगरकडून भरधाव येणाऱ्या अज्ञात पिकप वाहणाने दुचाकीवरुन बहिणीला भेटण्यासाठी नगरला जात असलेल्या सुनील नवनाथ ससाणे या विवाहित तरुणाच्या दुचाकीला समोरून धडक दिली. या अपघातात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघातानंतर अज्ञात पिकप चालकाने घटनास्थळावरन पोबारा केल्याचे अंभोरा पोलिसांकडून सांगण्यात आले. मयत सुनील यांच्या पश्च्यात पत्नी, एक मुलगा, आई- वडील, भाऊ असा परिवार आहे. या तरुणाच्या दुर्दैवी मृत्यूमुळे गावावर शोककळा पसरली असून, हळहळ व्यक्त होत आहे.

## दलित वस्ती कामात बोगसगिरी

**मुक्ताराम गवळी: चौकशीसाठी करणारा आंदोलन**

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी: पंचायत समिती व जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंबाजोगाई यांच्या वतीने परळी तालुक्यात करण्यात आलेल्या दलित (अनुसूचित जाती) वस्तीतील बोगस कामांची चौकशी करून कारवाई करावी अन्यथा दिनांक २८ मे रोजी परळी पंचायत समितीच्या आवारात जनावरे सोडून अनोखे आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते मुक्ताराम गवळी यांनी दिला आहे.

याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती,परळी यांना दिलेल्या निवेदनात गवळी यांनी म्हटले आहे की, आपल्या कार्यालयाच्या वतीने तसेच जिल्हा परिषद , बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी परळी तालुक्यातील दलित वस्तीचा निधी इतरत्र वळविला आहे.तसेच जे कामे केली आहेत ती बोगस आहेत.बोगस कामे करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे.या सर्व कामांच्या चौकशीसाठी यापूर्वी मुक्ताराम गवळी यांनी बीड जिल्हाधिकारी यांना ४ मार्च २०२५ रोजी निवेदन दिले होते.परंतू त्यांवर कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे दिनांक २६ मे पर्यंत कारवाई झाली नाही तर दिनांक २८ मे रोजी परळी पंचायत समितीच्या आवारात गाय, बैल, म्हैस ,शेळी, कुत्रे, मांजर, आदी जनावरे सोडून आंदोलन करणार असल्याचे मुक्ताराम गवळी यांनी म्हटले आहे. गवळी यांच्या वेगळ्या आंदोलनाची सर्वत्र चर्चा होत आहे.

## संजय सिरसटांचा नागरी सत्कार

**दिपक घायाळ: उपस्थित राहण्याचे आवाहन**

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि.२४ शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.या नागरी सत्कारास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे तालुका अध्यक्ष दिपक घायाळ यांनी केले आहे.

शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या या नागरी सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे असणार आहेत.तर स्वागत अध्यक्ष उपसभापती श्रीहरी मोरे, हे भूषवणार आहेत. त्याचप्रमाणे कार्यक्रमात माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाश सोळंके आ.सुरेश धस,आ. विजयसिंह पंडित,आ.नमिता मुंदडा,शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे. दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समिती बहुजन विकास मोर्चाची सर्व टीम काम करीत असून या कार्यक्रमास हजारच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चेचे तालुकाध्यक्ष दिपक घायाळ यांनी केले आहे.

## परळी शहरांमध्ये स्वच्छतेचा प्रश्न

**चेतन सौंदळे: नगरपरिषद प्रशासनाने लक्ष द्यावे**

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:मोसमा आधीच्या पावसानेच परळी शहरातील नाल्या व गटारीतील पाणी रस्त्यावर येवून पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे नागरिकांना अनेक प्रभागात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे त्यामुळे नगर परीषदे मार्फत तात्काळ प्रभागनिहाय नालेसफाई व स्वच्छता मोहिमेद्वारे गटारी सांडपाणी वाहिन्यांचे प्रवाहीकरण तसेच नागरिकांच्या अडचणी व तक्रारीचे निवारण हेल्पलाईन क्रमांकाद्वारे करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांनी परळी नगर परीषद मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



याबाबत नगरपालिका प्रशासनाच्यावतीने अधिक्षक संतोष रोडे यांनी निवेदन स्वीकारून तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. निवेदनात परळी शहरातील ओढे,मोठया नाल्या व नदीकाठी राहणा-या तसेच शहरी वस्तीभागातील सर्व प्रभागात तात्काळ नालेसफाई व स्वच्छता मोहिम राबवून नागरिकांच्या मुलभूत गरजांकरिता यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता,पिण्याचे पाणी,पथदिवे,रस्त्यावरील खड्डे बुजविणे तसेच आपत्कालिन परीस्थितीत अडचणी व तक्रारीचे निवारण व्हावे याकरिता नागरिकांसाठी नगरपालिका प्रशासना मार्फत हेल्पलाईन क्रमांकाद्वारे दखल घेण्याची मागणी चेतन सौंदळे यांनी केली आहे.

**निर्णय** | **राज शिष्टाचाराचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करा**

# जिल्ह्य न्यायालयात निषेधाचा ठराव

पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर:सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मुंबई भेटीदरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राज शिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल जिल्हा न्यायालयात अहमदनगर जिल्हा बार असोसिएशनच्या वतीने निषेधाचा ठराव करण्यात आला विशेष सरकारी वकील अँड सुरेश लगड यांच्या अध्यक्षतेखाली बार असोसिएशनच्या वतीने तातडीची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीत सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मुंबई भेटीदरम्यान राज शिष्टाचाराचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी असा ठराव सहमत करण्यात आला ठराव अँड महेश काळे यांनी मांडला त्याला सादीक बेग यांनी अनुमोदन दिले

या वेळी बार असोसिएशनचे अध्यक्ष अँड सुरेश लगड म्हणाले की उच्च पदस्थ न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या मुंबई भेटीदरम्यान राजशिष्टाचाराचे पालन न होणे खेदजनक आहे न्यायमूर्ती भूषण गवई हे महाराष्ट्रातील एकमेव न्यायमूर्ती असून त्यांचे एवढ्या मोठ्या पदावर सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होणे भुषणावह बाब आहे. या वेळी बार असोसिएशनचे राजेश कावरे बार असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष अँड राजाभाऊ शिर्के अँड संजय दराडे अँड सतीशचंद्र सुद्रिक अँड योगेश थोरात अँड साबीर सय्यद अँड अमित गाडेकर आदी उपस्थित होते



### जाहिर प्रगटन

तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३/२०२५ कौशल्या यादवराव सोनवणे ग्रामपंचायत कार्यालय, अंजनवती १) कौशल्या यादवराव सोनवणे रा. अंजनवती ता.जि.बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन कौशल्या यादवराव सोनवणे यांचे जन्म १५/०३/१९७० रोजी जन्म झाला नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्म यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास अंजनवती ता.जि.बीड येथे जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय अंजनवती ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/०६/२०२५ ही आहे.

स्वाक्षरीत /-
**तहसिलदार, बीड**